# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०१ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १०, १९३९ ( शके )**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८६**

---

### मुंबई विद्यापीठाला शैक्षणिक संस्थांच्या राष्ट्रीय नामांकन यादीत स्थान मिळण्याबाबत

**(१) * ३३७४३ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिरक महोत्सवी वर्ष साजरे करीत असलेल्या मुंबई विद्यापीठाला शैक्षणिक संस्थांच्या राष्ट्रीय नामांकन यादीत स्थान मिळाले नसल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाने सन २०१२ मध्ये (नॅक) मुल्यांकन प्रक्रिया पूर्ण केली त्यावेळी विद्यापीठाला काठावर उत्तीर्ण करीत नॅकने ३.०५ गुण देऊन "अ" दर्जा दिला होता तसेच नॅकचा हा दर्जा कायम ठेवण्यासाठी विद्यापीठाने सहा महिने आधीपासून मुल्यांकन प्रक्रिया सुरु करणे अपेक्षित असताना विदयापीठाकडे नॅकचे मुल्यांकन नसल्यामुळे विदयापीठाच्या कामकाजात अडचणी निर्माण झाल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) १ एप्रिल, २०१७ नंतर NAAC च्या मुल्यांकनाची प्रक्रिया बदलली असून सदर प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुटसुटीत असल्यामुळे मुंबई विद्यापीठाने सदर प्रणाली नुसार NAAC मध्ये मुल्यांकन करुन घेण्याचा निर्णय घेतला आहे. सदर प्रक्रिया NAAC च्या पातळीवर ५ जुलै, २०१७ नंतर सुरु करण्यात आली असून सदर प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी विद्यापीठाकडून आवश्यक ती पावले उचलण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांना थकबाकीच्या सर्व रक्कमा अदा करण्याबाबत

**(२) * ३२६८१ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील नवनियुक्त प्राध्यापकांचे सन २०१२-२०१३ पासूनचे थकीत वेतन, लेट ॲप्रुव्हल, लेट सिक्थ पे फिक्सेशन, प्रमोशन्स, पीएच.डी./एम.फील इनक्रीमेंट्स यांची थकबाकी अद्यापी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन हजाराहून अधिक प्राध्यापकांची थकबाकी रुपये १०० कोटींपर्यंत असून ३५ कोटींची पुरवणी मागणी अद्यापी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) मुंबई विद्यापीठाशी संलग्न अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापकांना सन २०१४-१५ या आर्थिक वर्षअखेर पर्यंतच्या थकबाकीच्या सर्व रक्कमा अदा करण्यात आल्या आहेत. सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मधील थकबाकीबाबत वित्त विभागास पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके**
**चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबत**

**(३) * ३११६४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७९७९ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याकरिता नाशिक विकास कार्यक्रमांतर्गत दिनांक २७ ऑगस्ट, २००९ रोजी रुपये १० कोटी नियतव्यय निश्चित केल्यानुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळास सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी मुंढेगाव (ता.इगतपुरी) येथील जागा सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे हस्तांतरीत करण्याकरिता महसूल व वन विभागास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चित्रपटसृष्टीसाठी सांस्कृतिक कार्य विभागास जमिनीचे हस्तांतरण करून सदर चित्रपटसृष्टीचे काम सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे ही खरे आहे.

(३) चित्रपटसृष्टीसाठी प्रस्तावित जमीन सांस्कृतिक कार्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यास महसूल व वन विभागास विनंती करण्यात आली असून याबाबत त्या विभागाकडून जमीन हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याबाबत**

**(४) * ३२४३१ श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार माहे एप्रिल, २०१७ अखेरपर्यंत दिले नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यातील शिक्षकांना सन्मानित करण्यासाठी दिनांक २१ जुलै, २०१६ च्या शासन आदेशाने आदर्श शिक्षकासाठी प्रस्ताव online मागविण्यात येत असून सदर प्रस्ताव मागविण्यात येत असताना त्यास विविध घटकानुरूप गुण देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शासन निर्णयानुसार मुख्याध्यापकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देत असताना शाळेच्या १०० टक्के निकालाची अट घालण्यात आली असून नैसर्गिक आणि आपत्कालीन अडचणीच्या काळात परीक्षा देऊ न शकणा-या विद्यार्थ्यांमुळे निकालाचे प्रमाण कमी होत असून, मुख्याध्यापकास यासाठी जबाबदार ठरविण्यात येत असल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निकालाची अट शिथिल करुन शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२) होय.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या वार्षिक अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(५) * ३२०८५ ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक २३७१३ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, मराठी साहित्य परिषद याबरोबरच राज्यातील महत्वाच्या संस्थांचे वाढीव अनुदान शासनाकडे मागील तीन वर्षापासून थकीत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थांचे अनुदान थकीत ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर संस्थांचे थकीत अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचेकडून उपरोक्त सात साहित्य संस्थांच्या प्रचलित अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कला, क्रीडा व कार्यानुभव निदेशक पदे कायम करण्याबाबत**

**(६) * ३३८३० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरटीई ॲक्ट, २००९ नुसार कला, क्रीडा व कार्यानुभव निदेशक पदे कायम करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी सन २०१५ मधील याचिका क्रमांक ११७७१ मध्ये आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वरील पदे कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद येथील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(७) * ३३७७० श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद येथील २८ प्राध्यापकांवर विदयापीठाने सहा कोटीपेक्षा अधिक खर्च करण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नमूद विद्यापीठातील २८ प्राध्यापकांच्या वेतनावर विद्यापीठाने आतापर्यंत सुमारे ४.९८ कोटी खर्च केलेला आहे.

(२) प्रश्नात नमूद विद्यापीठातील ३० सहायक प्राध्यापकांचे वेतनाचे दायित्व दि. २८ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये शासनाने घेतलेले आहे. त्यापैकी कार्यरत २८ पदाच्या वेतन प्रस्ताव विद्यापीठाकडून विभागीय सहसंचालक, औरंगाबाद यांच्याकडे मंजूरीस्तव पाठविण्यात आले असता सहसंचालक कार्यालयाकडून या प्रकरणी तपासणी करुन आवश्यक अभिलेखाची मागणी विद्यापीठाकडे करण्यात आलेली आहे. सदर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदर अध्यापकांचे वेतन विद्यापीठ निधीतून मागविण्यात येत आहे. त्यामुळे कोणाविरुध्द कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठांचे विभाजन करण्याबाबत

**(८) * ३१५३५ श्री.संजय दत्त, ॲड.अनिल परब, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.शरद रणपिसे : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक १८५९१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयांची व विद्यार्थ्यांची वाढती संख्या विचारात घेता उच्च व तंत्र शिक्षणाचा कारभार सांभाळण्यासाठी सध्याच्या विद्यापीठांच्या यंत्रणा कमी पडत असल्यामुळे राज्यातील सर्वच विद्यापीठांचे विभाजन करुन १०० ते १५० महाविद्यालयांसाठी एक याप्रमाणे लहान-लहान विद्यापीठे स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या विद्यापीठांचे विभाजन करण्यासंदर्भात नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय व त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, याबाबत घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे, तसेच सदर प्रस्तावावर अंमलबजावणी करुन सदरहू महाविद्यालयांची कोणकोणत्या विभागात निर्मिती करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नांच्या अनुषंगाने असे नमूद करण्यात येते की, ज्या विद्यापीठांमध्ये संलग्नित महाविद्यालयांची संख्या ५०० पेक्षा अधिक आहे. त्यांचे विभाजन करून राज्यात नवीन विद्यापीठे स्थापन करावी किंवा विद्यापीठांचे विभाजन करावे किंवा पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेण्यासाठी एक स्वतंत्र मंडळ स्थापन करावे व पदव्युत्तर आणि संशोधनाचे कार्य विद्यापीठाकडे ठेवावे याबाबत शासनास सल्ला देण्यासाठी राज्यातील अकृषी विद्यापीठांतर्गत होणाऱ्या उपकेंद्रासाठी धोरण विहित करण्यासाठी डॉ. योगानंद

काळे यांच्या अध्यक्षतेखाली घटीत केलेल्या समितीने अहवाल शासनास सादर केला आहे. त्यामध्ये राज्यातील विद्यापीठांचे विभाजन करून जिल्हानिहाय, उपकेंद्रे निर्माण करण्यात यावीत अशी शिफारस केली असून, केलेल्या शिफारशी स्विकारण्यात याव्यात किंवा नाही व त्याबाबतची व्यवहरता तपासून अंतिम निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे विद्यापीठाचे नाशिक व अहमदनगर येथे उपकेंद्र सुरु करण्याबाबत**

**(९) * ३३०७३ डॉ.सुधीर तांबे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २७६८७ ला दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणारी ६८० महाविद्यालये आणि २५० हून अधिक संख्या संलग्न असल्याने प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रशासकीय यंत्रणेवर कामकाजाचा मोठा ताण विचारात घेता नाशिक व अहमदनगर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्याबाबत दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ च्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अकृषि विद्यापीठांतर्गत उपकेंद्र निर्मितीसाठी समान धोरण निश्चित करण्याकरिता दिनांक २८ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार होणाऱ्या उपकेंद्रांसाठी धोरण विहीत करण्यासाठी माजी कुलगुरू डॉ.योगानंद काळे यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालातील शासनाच्या विचाराधीन असलेल्या शिफारशींवरील शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय, या शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाशिक उपकेंद्राकरिता पुर्णवेळ स्वतंत्र उपकुलगुरू नियुक्ती करुन विद्यापीठाच्या नाशिक व अहमदनगर उपकेंद्राचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) च्या संदर्भात, राज्यातील अकृषि विद्यापीठांतर्गत उपकेंद्र निर्मिती संदर्भात एक समान धोरण निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या डॉ. योगानंद काळे समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशीमध्ये प्रामुख्याने स्थानिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, संशोधनात्मक विस्तारीत सेवा, प्रशासकीय प्रमाणता, उपकेंद्रासाठी पायाभूत सुविधांचा विकास आर्थिक स्त्रोताचे नियोजन, पदरचना इ. बाबी संदर्भात समितीने शिफारशी केल्या असून समितीने केलेल्या शिफारशींची व्यवहार्यता तपासून अकृषि विद्यापीठांतर्गत उपकेंद्र स्थापनेबाबतचा निर्णय शासनाच्या विचारधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व तालुक्यात क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(१०) * ३१३३२ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक २३२१५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण ३८० तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरून उर्वरित १७४ तालुका क्रीडा संकुल समित्या गठीत करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित १७४ तालुका क्रीडा संकुल समित्या गठीत करुन तालुकास्तरावरून क्रीडा संकुल उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

तथापि, सद्य:स्थितीत २३७ तालुका क्रीडा संकुल, समिती गठीत झाली असुन १४३ तालुका क्रीडा संकुलाची समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) सदर १४३ पैकी १०८ तालुका क्रीडा संकुलास अद्याप जागा अप्राप्त आहे. (मुंबई शहर व मुंबई उपनगर मधील वार्डसह)

उर्वरित ३५ तालुका क्रीडा संकुल समितीच्या सुधारीत शासन निर्णय नुसार समिती गठीत करण्यास विलंब होण्याचे कारणे, संकुल समितीची बैठक न होणे, जागा उपलब्ध नसणे व अन्य तांत्रिक कारणास्तव, इ. कारणामुळे विलंब होत आहे.

सदर तालुका क्रीडा संकुल समिती गठीत करण्यासाठी तांत्रिक कारणास्तव शासनस्तरावरुन मार्गदर्शन मागविण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अर्धवेळ अतिरिक्त शिक्षकांना पुन्हा सेवेत समाविष्ट करण्याबाबत**

**(११) * ३३४९० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २६०२७ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र खाजगी कर्मचारी सेवाशर्ती नियमावली, १९८१ नियम २१ अंतर्गत कार्यभारानुसार शिक्षक संख्या मंजूर करताना प्रमाणित कार्यभाराच्या १/३ पेक्षा कमी कार्यभाराकरिता पूर्ण वेळ शिक्षकाचे पद मंजूर न करता अर्धवेळ शिक्षकाचे पद मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अर्धवेळ कर्मचारी हे महाराष्ट्र खाजगी कर्मचारी सेवाशर्ती नियमावली, १९८१ नियम २१ अंतर्गत सर्व अटी व शर्तीची पूर्तता करीत असून आर.टी.ई. ॲक्ट, २००९ व शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ नुसार अर्धवेळ हे पद सेवक संचात व्यपगत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अर्धवेळ शिक्षकांना महाराष्ट्र खाजगी कर्मचारी सेवाशर्ती नियमावली, १९८१ नियम २६ प्रमाणे अतिरिक्त ठरवून दुस-या ठिकाणी अतिरिक्त करुन त्यांच्या सेवेला संरक्षण देण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अर्धवेळ शिक्षकांना पुन्हा सेवेत समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) होय हे खरे आहे, अर्धवेळ शिक्षकांना सेवा संरक्षण देण्याबाबत महाराष्ट्र खाजगी कर्मचारी सेवाशर्ती नियमावली, १९८१ मध्ये तरतुद नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्हयात शिक्षकांची भरती करण्याबाबत**

**(१२) * ३२३४२ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयात साडेतीन हजार उमेदवार शिक्षक भरतीच्या प्रतिक्षेत असुन अदयापही शिक्षक भरती होत नसल्याने डि.टी.एड बेरोजगार संघर्ष समितीने आंदोलनाचा इशारा दिला असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सन २०१० मध्ये प्राथमिक भरती संदर्भातील सीईटी परिक्षा घेण्यात आली असुनही शिक्षक भरती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) स्थानिक स्वराज्य संस्थैंतर्गत प्राथमिक शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याकरिता सन २०१० मध्ये केंद्रीय भरतीपूर्व निवड चाचणी परीक्षा घेण्यात आलेली होती. सदर परीक्षेत एकूण १८४०३ उमेदवार पात्र ठरले असून मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार शिक्षण सेवक पदी त्यांना पदस्थापना देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील रासायनिक कंपन्यांमुळे नद्यांचे पाणी प्रदूषित झाल्याबाबत**

**(१३) * ३२४५८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महाड, रोहा, खालापूर, पनवेल व पेण या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात रासायनिक कंपन्या कार्यरत असून पर्यावरण विभागाने रासायनिक कंपन्यांनी प्रदूषित सांडपाणी प्रक्रिया करून सोडण्यात यावे याबाबत दिलेल्या सूचनांचे उल्लंघन करून रासायनिक कंपन्या नदी पात्रात प्रदूषित सांडपाणी सोडत असल्याने परिसरातील शेतीचे व छोट्या मच्छिमारांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रासायनिक प्रदूषित सांडपाण्यामुळे शेतकऱ्यांचे व छोट्या मच्छिमारांच्या होणाऱ्या नुकसानाबाबत कार्यवाही करुन प्रदूषित सांडपाणी प्रक्रिया न करता सोडणाऱ्या रासायनिक कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) तथापि,

अ) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात येऊन पाहणी दरम्यान संमती पत्रातील अटींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास दोषी उद्योगांवर कारणे दाखवा नोटीस बजावणे, प्रस्तावित आदेश देणे, उत्पादन प्रक्रिया थांबवणे, बँक हमी जप्त करणे तसेच उद्योग बंद करणे किंवा न्यायालयामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करणे अशा स्वरुपाच्या कायदेशीर कारवाई करण्यात येते.

ब) एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ या कालावधीत एकूण १८० उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, १९६ उद्योगांना प्रस्तावित आदेश व १४ उद्योगांना बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नियमबाह्यरित्या महाविद्यालयांना मान्यता दिल्याबाबत

**(१४) * ३२८०८ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी काही महाविद्यालयांना, कोणत्याही प्रकारे नियमांची पूर्तता न करता, तसेच तेथे याआधी महाविद्यालये अस्तित्वात असतानाही नविन महाविद्यालयांना गैर मान्यता दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा किंवा महाविद्यालयांना मान्यता देताना जागा, प्रशिक्षित शिक्षक, आरोग्य सुविधा व इतर बाबींची तपासणी करुनच परवानगी दिली जात असताना मा.शालेय शिक्षणमंत्र्यांनी नियमबाह्यरित्या महाविद्यालयांना परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी महाविद्यालये अस्तित्वात असताना नियमबाह्यरित्या महाविद्यालयांना परवानगी देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८२(५) मधील परंतुकामध्ये नमुद केल्याप्रमाणे अपवादात्मक प्रकरणांमध्ये काही ठिकाणी अस्तित्वात असणारी महानगरे लक्षात घेता, तसेच या महानगराचा होणारा झपाटयाने विकास, वाढलेली लोकसंख्या व त्याची गरज लक्षात घेऊन या भागात शैक्षणिक संस्थांची असणारी गरज पाहता, तसेच ग्रामीण भागांमध्ये शैक्षणिक दृष्टया मागासलेला तालुका दुर्गम व डोंगराळ भाग लक्षात घेऊन तसेच, महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असल्याने लेखी कारणे नमुद करून शासनाने स्वेच्छाधिकारानुसार दिनांक ५/८/२०१६ अन्वये १३ महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता मान्यता प्रदान केलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात कायमस्वरुपी पाणीटंचाई निवारणासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१५) * ३३९९१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात पावसाळयाच्या सुरुवातीस पाणी टंचाई योजना, विहीर अधिग्रहण आणि टँकर सुरु करणे याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूरी दिली असून जिल्हयात अद्याप २२ टँकर सुरुच असून कायमस्वरुपी पाणीटंचाई निवारणासाठी कोणतीच उपाययोजना करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच पावसाळा सुरु होण्याच्या मार्गावर असताना ४० खाजगी विहीरी अधिग्रहित करुन केवळ पाच टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेचे काम मुदतीत पूर्ण न झाल्याने टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यवतमाळ जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता कार्यवाही करुन सदर योजना कार्यान्वित होण्यास होत असलेल्या दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) यवतमाळ जिल्हा परिषदेंतर्गत सन २०१६-१७ मधील टंचाई कालावधीत ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणार्थ २ कोटी ८८ लक्ष इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली आहे. तसेच रु. १९.४० लक्ष इतक्या रकमेच्या टंचाई पूरक कृती आराखडयास मंजूरी देण्यात आली आहे. तर १४ व्या वित्त आयोगांतर्गत ३२७ गावात ६९० विंधन विहीरींची कामे मंजूर करण्यात आली आहेत व MREG अंतर्गत २५ विहीरींची कामे पूर्ण झाली असून, ४९ विहीरींची कामे प्रगतीपथावर आहेत.

यवतमाळ जिल्हयामध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ मध्ये २९ योजना पुर्ण करण्यात आल्या असून, १७ योजनांची कामे प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बिजोरा (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथे पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(१६) * ३४१४८ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिजोरा (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून राष्ट्रीय पेयजल योजनेतून कामे मंजूर असताना प्रशासनाच्या दिरंगाईमुळे सदर योजना प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

मे, २०१७ मध्ये महागांव तालुक्यातील ग्रामपंचायत बिजोरा येथे ३ हातपंप, ग्रामपंचायतीची १ विहीर तसेच एका विंधनविहीरीवरुन पाणीपुरवठा सुरु होता.

तसेच बिजोरा येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर योजनेच्या जादा दराच्या निविदेस ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने मंजूरी न दिल्यामुळे योजनेचा प्रथम हप्त्याचा निधी जिल्हा परिषदेला परत करण्यात आला.

(२) सदर ठिकाणी १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून २ विंधन विहीरी घेण्यात आल्या असून, त्यापैकी एकावर हातपंप तर दुसरीवर विद्युत पंप बसविण्यात आले आहेत. तसेच अस्तित्वातील सार्वजनिक विहीरीला पाण्याची आवक वाढविण्याकरीता आडवे बोअर घेण्यात आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात पटसंख्या कमी असलेल्या शाळांच्या अनुदानात कपात करण्याबाबत**

**(१७) * ३०९७४ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कमी पटसंख्या असणा-या शाळा बंद करण्याचे व त्यांच्या निधीत कपात करण्याबाबत शिक्षण विभागाच्या विचाराधीन असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत निर्णय घेऊन आतापर्यंत राज्यातील कमी पटसंख्या असणा-या किती शाळांवर कारवाई करण्यात आली,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद शाळांमधील शिक्षकांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (नागपूर) येथील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वाढीव पदे भरण्याबाबत**

**(१८) * ३२७७६ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.परिणय फुके, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक २८७१५ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (नागपूर) येथील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची वाढीव पद भरतीसाठी विद्यापीठाने शासनाकडे प्रस्ताव सादर करुनही वाढीव पदांना मंजूरी देण्यात आली नसल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, शिक्षक यांची देखील ३७३ पदे रिक्त असल्याचे दिनांक ६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त असलेली पदे भरुन वाढीव पद भरतीस मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

नमूद विद्यापीठाने वित्त विभागाच्या दिनांक २/६/२०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पद भरती करिता दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २०/०५/२०१७ च्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना पाठविला असून सदर प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या दिनांक ३१/०५/२०१७ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावात नमूद विद्यापीठात शिक्षक संवर्गाची १५१ रिक्त पदे आहेत.

(३) शासनाच्या दिनांक २३/०९/२०१६ व दिनांक २१/०४/२०१७ च्या पत्रान्वये वित्त विभागाच्या दिनांक २/६/२०१५ व दिनांक १४/०१/२०१६ तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६/७/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रिक्त पदे भरण्याबाबत सर्व अकृषि विद्यापीठांना सूचना दिलेल्या आहेत.

संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून दिनांक ३१/५/२०१७ च्या पत्रान्वये राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांमध्ये वाढीव पदभरतीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, वित्त विभागाच्या दिनांक २५/५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार जे विभाग आकृतीबंध मंजूर करून घेणार नाहीत, तोपर्यंत त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. राज्यातील अकृषि विद्यापीठातील शिक्षकीय व शिक्षकेतर पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वरवडे-परबवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील बोअरवेलचे अतिरिक्त कनेक्शन काढण्याबाबत**

**(१९) * ३३०९८ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरवडे-परबवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथे मंजूर असलेल्या बोअरवेलवर फक्त ३० नळ जोडणीची क्षमता असतांना दरम्यानच्या काळात १०० पेक्षा अधिक नळजोडणी कनेक्शन नियमबाह्यरित्या देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये सदर बोअरवेलचे शासनामार्फत नुतनीकरण करतेवेळी मूळ बोअरवेलला ५ हॉर्स पॉवरची असणारी मोटार बदलुन ३ हॉर्स पॉवर तर १४ पाईपलाईन्स ऐवजी १२ च पाईप लाईन टाकण्यात आल्यामुळे ग्रामस्थांना अत्यंत कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्यामुळे सदर बोअरवेल वरील अतिरिक्त सर्व कनेक्शन काढून पुर्वीच्या मूळ मंजुर स्वरुपात बोअरवेल कार्यान्वित करण्याबाबतची तक्रार-निवेदने दिनांक ८ मार्च, २०१२ पासून ते दिनांक १३ जून, २०१७ पर्यंत स्थानिक श्री लिंगेश्वर हितवर्धक मंडळ वरवडे या संस्थेमार्फत व सरपंच, ग्रामपंचायत वरवडेमार्फत तत्कालीन जिल्हा पालकमंत्री व उद्योग मंत्री तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कणकवली यांचेकडे सादर केली असून मा.विरोधी पक्षनेते (विधानसभा) यांनी देखील माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.ग्रामविकास मंत्री यांना पत्र-निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बोअरवेलच्या हॉर्स पॉवर मोटर बदलण्यास व कमी पाईप्स पुरविण्यास तसेच नियमबाह्य जादा नळ जोडणी कनेक्शन वापरणाऱ्या संदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

वरवडे-परबवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथे ग्रामस्थांच्या मागणीनुसार सार्वजनिक नळथांबे बंद करुन ७९ खाजगी नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

या योजनेसंदर्भात श्री. लिंगेश्वर ऐक्यवर्धक मंडळ, वरवडे यांचे सन २०१२ चे निवेदन जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडे आढळून येत नाही. मात्र, सदर मंडळाने ग्रामपंचायत वरवडे यांना दिनांक २७/७/२०१६ रोजी विविध कामासंदर्भात निवेदन दिले असून, सदरचे निवेदन ग्रामपंचायतीकडून जिल्हा परिषदेकडे आता प्राप्त झाले आहे. त्यामधील मुद्दा ८ हा परबवाडी येथील पाण्याबाबतचा आहे.

(३) १४ वा वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर अंतर्गत वरवडे-परबवाडी येथे विंधन विहीर दुरुस्त करणे व स्त्रोताचे पुनर्जिवन करणेबाबतची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. सदर योजनेची दैनंदिन देखभाल दुरुस्ती ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येत असून, योजनेमधून आजमितीस पाणीपुरवठा सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठात विधीच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * ३१५११ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातर्फे विधीच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी (एलएलएम) घेण्यात आलेल्या सीईटी परीक्षेत गोंधळ झाला असून, उत्तरे बोल्ड करण्यात आल्याने सदर परीक्षा पुन्हा घेण्यात यावी अशी मागणी विद्यार्थी संघटनांच्या वतीने कुलगुरु आणि मा. शालेय शिक्षण मंत्र्यांकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परीक्षेत अनेक प्रश्नाची पुनरावृत्ती झाल्याने तसेच काही प्रश्न बोल्ड करण्यात आल्याने परीक्षेतील गोंधळाचा विद्यार्थ्यांवर परिणाम होऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विषयाची फेर परिक्षा घेण्याबाबत कार्यवाही करुन प्रश्नपत्रिका फोडलेल्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रुबी नर्सींग होम केंद्र, घाटकोपर (मुंबई) येथे गैरपध्दतीने गर्भपात झाल्याबाबत**

**(२१) * ३१४५२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुबी नर्सींग होम केंद्र, घाटकोपर (मुंबई) येथे गैरपध्दतीने गर्भपात सुरु असल्यासंदर्भात शासनाच्या अन्न व औषधीद्रव्ये प्रशासन विभागाने दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छाप्यात रुबी होम केंद्रातून काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औषध व सौंदर्य प्रसाधन कायद्यानुसार नर्सिंग होम विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) दि. २६ एप्रिल, २०१७ रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पोलीसांसमवेत मे.रुबी नर्सींग होम, टागोर नगर, विक्रोळी, मुंबई या ठिकाणी छापा टाकला. पेढीच्या तपासणीदरम्यान तेथे गर्भपातासाठी वापरण्यात येणा-या Synokem Pharmaceuticals Ltd, हरिव्दार या पेढीकडून उत्पादित करण्यात आलेल्या A-Kare Tablet या औषधाचे ११ किट आढळून आले व १५ किटचा रिकामा बॉक्स आढळून आला. सदर ११ किटमधून ८ किटचा नमूना तपासणी व विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आला असून उर्वरीत ०३ किटचा साठा जप्त करण्यात आला आहे. तपासणी व विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आलेले नमुने चाचणी व विश्लेषणाकरिता औषध नियंत्रण प्रयोगशाळा मुंबई येथे पाठविण्यात आले असून, प्रयोगशाळेचा अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

(३) मे.रुबी नर्सींग होम येथे तपासणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने मे.रुबी नर्सींग होमच्या मालक डॉ.सविता चव्हाण व त्यांचे इतर सहकारी यांचेविरूध्द भा.दं.वि. कलम ४२०, ३४ आणि औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार तसेच MTP कायदा, १९७१ तील तरतुदीनुसार पोलिसांकडे प्रथम खबर अहवाल क्र. ११७/२०१७ दि. २७/०४/२०१७ रोजी नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू असून,

तो पूर्ण होताच पोलिसांकडून कागदपत्रे प्राप्त करून संबंधिताविरूध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार नियमानुसार आवश्यक ती न्यायालयान कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अन्न व औषध प्रशासन विभागातील गैरकारभाराची चौकशी करण्याबाबत**

**(२२) * ३२१२३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अन्न व औषध प्रशासन विभागातील गैरकारभाराची चौकशी करण्याची लेखी मागणी मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे मा.मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेले पत्र प्राप्त झाले आहे. तसेच मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा यांनी मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांना लिहिलेले पत्र प्राप्त झाले आहे.
(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना अन्न व औषध प्रशासनास देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील सहाय्यक कुलसचिव यांनी पदाचा दुरुपयोग केल्याबाबत**

**(२३) * ३३१२४ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील फेरमुल्यांकन विभागातील सहाय्यक कुलसचिव यांनी त्यांच्या मुलाची तीन विषयात फेरमोजणी करून गुणवाढ करुन घेऊन आपल्या पदाचा दुरुपयोग केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या पुनर्मुल्यांकन विभागातील तत्कालीन सहाय्यक कुलसचिव यांनी त्यांच्या मुलाच्या उन्हाळी - २०११ च्या परिक्षेत पुनर्मुल्यांकनात गैरप्रकार केल्याबाबतची बाब दिनांक १६ जुलै, २०१२ रोजी निदर्शनास आली होती.

उपरोक्त बाब निदर्शनास आल्यानंतर, सदर बाब विद्यापीठाच्या अनुशासन कृती समितीकडे संदर्भित करण्यात आली होती. अनुशासन कृती समितीव्दारे सादर करण्यात आलेला अहवाल दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१३ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा मंडळापुढे सादर करण्यात आला. अहवालानुसार परीक्षा मंडळाने तत्कालीन सहाय्यक कुलसचिव, पुनर्मुल्यांकन विभाग यांच्याविरुध्द अनुशासनात्मक कार्यवाही करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार तत्कालीन सहाय्यक कुलसचिव यांना विद्यापीठाव्दारे विद्यापीठाच्या सेवेतून निलंबित करण्यात आले. तसेच त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करुन प्राप्त चौकशी अहवालानुसार त्यांना विद्यापीठाच्या सेवेतून निष्कासित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील छत्रपती शिक्षण मंडळ संचालित शाळेतील इमारत धोकादायक झाल्याबाबत**

**(२४) * ३३००७ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथे छत्रपती शिक्षण मंडळ संचालित शाळेत ६०० विद्यार्थी धोकादायक इमारतीमध्ये शिक्षण घेत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर शाळेच्या वर्गखोलीच्या भिंतीची दुरूस्ती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**(२५) * ३१३२९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात २१ शासकीय धान्य साठविण्याचे गोदाम असून त्यांचा कार्यभार बेकायदेशीररित्या विविध प्रकरणात चौकशी सुरु असलेल्या आणि गुन्हा दाखल झालेल्या गोदाम रक्षक यांना दिला असून बीड जिल्ह्यातील नेकनूर, चौसाळा व इतर धान्य गोदामात धान्याचा अपहार झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१४ नंतर बीड जिल्ह्यात धान्य व केरोसीन गैरव्यवहाराच्या संदर्भात किती गुन्हे दाखल करण्यात आले, तसेच कोण-कोणत्या प्रकरणात चौकशी प्रस्तावित करण्यात आली,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान्य अपहार व इतर प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) जिल्हाधिकारी, बीड यांच्या आदेशान्वये तहसिलदार, बीड यांनी सन २०१७ मध्ये केलेल्या तपासणीत शासकीय धान्य गोदाम, नेकनूर येथे तांदूळ २०७ क्विंटल व शासकीय धान्य गोदाम, चौसाळा येथे गहू १९८.७९ क्विंटल असे एकूण ४०५.७९ धान्य कमी असल्याचे आढळून आले आहे.
(२) व (३) बीड जिल्ह्यामध्ये धान्य व केरोसीन गैरव्यवहाराच्या संदर्भात एकूण ९ गुन्हे दाखल आहेत. गोदाम धान्याच्या गैरव्यवहारात शासकीय धान्य गोदाम नेकनूर व चौसाळा येथील तत्कालीन गोदाम रक्षक श्री. दिलीप गालफाडे व शासकीय धान्य गोदाम गेवराई येथील तत्कालीन गोदाम रक्षक श्री. महादेव महाकुडे यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.एम.डी.भंडारे, तत्कालीन गोदाम रक्षक यांना दिनांक १२/०७/२०१७ रोजी निलंबित केले आहे व विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इस्त्रा महाविद्यालय दहिसर (पूर्व), मुंबई येथून**
**दहावीच्या उत्तरपत्रिका चोरी झाल्याबाबत**

**(२६) * ३३२६२ श्री.तानाजी सावंत, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इस्त्रा महाविद्यालय दहिसर (पूर्व), मुंबई येथून दहावीच्या ५२६ उत्तरपत्रिकाची चोरी झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून विलेपार्ले येथे एक शिक्षक हॉटेलमध्ये बसून उत्तरपत्रिका तपासत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला असल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच दहावीच्या उत्तरपत्रिका रद्दी म्हणून विकल्या गेल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुंबई उपनगरात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इस्त्रा महाविद्यालयातील ५२६ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असून उत्तरपत्रिका चोरी प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विभागीय मंडळाने समिती नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या सुरक्षिततेबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हाफकिन संशोधन संस्थेला संशोधनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) * ३३००३ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ येथील हाफकिन संशोधन संस्थेला शासनाकडून संशोधनासाठी कोणतीही आर्थिक मदत मिळत नसल्यामुळे या संस्थेत काही किरकोळ संशोधन व चाचण्या वगळता कोणतेही संशोधन होत नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून या संशोधन संस्थेच्या एकूण पदांपैकी ६० टक्के पदेही भरण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या संस्थेला पुन्हा जागतिक दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी संशोधनासाठी आवश्यक तो निधी, रसायने तसचे अद्ययावत उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच संशोधकाची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) संस्थेला शासनाकडून प्रतिवर्षी संशोधनाकरिता सहायक अनुदान मंजुर करण्यात येते. तसेच संस्थेच्या गट अ व ब पदांपैकी ५५ टक्के पदे भरण्यात आली आहेत.

(२) हाफकिन संस्थेच्या व्यापक सुधारणासाठी पथदर्शक प्रकल्प तयार करण्यासाठी डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६/०६/२०१७ अन्वये उच्च स्तरिय तज्ञ समिती नियुक्त करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठी भाषा संचालनालयासाठी संचालकाची नियुक्ती करण्याबाबत**

**(२८) * ३१२१९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषा संचालनालयातील भाषा विभागासाठी पुर्ण वेळ संचालक नसल्यामुळे सन २०११ पासून आजतागायत भाषा संचालकाचे पद रिक्त असल्याचे दिनांक ९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**बीड जिल्हयात वक्फ बोर्डाच्या जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(२९) * ३३२४२ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **वक्फ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात वक्फ बोर्डाची एकूण किती जमीन तालुका निहाय आहे,

(२) असल्यास, वक्फ बोर्डाच्या जमिनीवर अतिक्रमण होत असल्याची तक्रार जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली असून या जमिनीवर नियमबाह्य प्लॉटिंग करण्यात आले असल्याने प्लॉटींग व अतिक्रमणाबाबत चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, बीड यांनी दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वक्फ बोर्डाच्या जमिनीवर होत असलेले अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ४ अन्वये महाराष्ट्र शासनाने दिनांक १/१२/१९९७ च्या अधिसूचनेन्वये जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य यांची वक्फ मिळकतीचे पहिले सर्वेक्षण करण्यासाठी सर्वेक्षण आयुक्त म्हणून नियुक्ती केली होती. त्यांनी आपला सर्वेक्षण अहवाल दिनांक ३१/१/२००२ रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालानुसार बीड जिल्हयात खालीलप्रमाणे वक्फ जमिनी आहेत :-

| अ.क्र. | तालूका | वक्फ संस्था | ग्रामीण क्षेत्र (हेक्टर) | शहरी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बांधीव (चौ.मी.) | मोकळी जागा(हे.आर) |
| १ | बीड | १८४ | २६८७ | ८९४.५२ | १५८८.६६ |
| २ | गेवराई | २६६ | २४१४.५७ | ९५१.१० | १७६.५५ |
| ३ | आष्टी | २४६ | ७९२.०१ | ६६३.६० | ४.४९ |
| ४ | माजलगाव | २३५ | २२९५.०१ | ९०९.४७ | ०.०६ |
| ५ | केज | १५१ | ३५९.९६ | ७५२.५४ | २.४३ |
| ६ | पाटोदा | ११३ | ३९६.०५ | २१०.१३ | ०.०० |
| ७ | शिरुर | १०९ | १३५.७२ | ८८.०० | ०.०० |
| ८ | आंबेजोगाई | ३०३ | ०.०० | २३७.४५ | ४.४३ |
| ९ | धारुर | १५३ | २३४.५६ | ७७४.५२ | ३.६५ |
| १० | परळी | १७५ | ३९१.२७ | ४३२.०२ | २०.८ |
| ११ | वडवणी | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकूण | **२११०** | **९७०६.१५** | **५९१३.३५** | **१७८२.३५** |

(२) होय. दर्गाह हजरत कोचकशाह वली, बीड या वक्फ संस्थेच्या सजा बीड-पिंगळे येथील एकूण ७९७ एकर जमिनीपैकी स.नं.३१ व ३२ ची विक्री होत असल्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक ०५/०४/२०१७ रोजी तक्रार प्राप्त झाली होती. त्यास अनुसरुन उपविभागीय अधिकारी, बीड यांची सदर प्रकरणी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) सजा बीड-पिंगळे येथील जागेचा दिनांक २८/४/२०१७ रोजी उपविभागीय अधिकारी, बीड यांनी प्रत्यक्ष दर्शी पंचनामा केला असून सर्वे नं.३२ मध्ये “इतर हक्क रकान्यात” नाव असलेल्या इनामदारांकडून प्लॉटींग करुन तिचे भाडे तत्वावर २५ वर्षाच्या करारावर दुय्यम निबंधक कार्यालयात दस्तनोंदणी न करता विक्री करण्याचे ठरलेले दिसून आले आहे. तसेच सर्वे नं.३१ मध्ये प्लॉटींग केल्याचे दिसून आले नाही व जमिनीत पीक देखील दिसून आलेले नाही. सर्व हितसंबंधितांना सुनावणीसाठी बोलाविण्यात आले असून चौकशीनंतर हैद्राबाद अतियात चौकशी कायदा, १९५२ अन्वये वक्फ मंडळाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, बीड यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील १९६ महाविद्यालये बंद करण्याबाबत**

**(३०) * ३१३४३ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील १९६ महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची थोडक्यात कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) विद्यार्थी संख्येचा अभाव तसेच महाविद्यालयांनी संलग्निकरण न केल्यामुळे, संबंधित महाविद्यालये बंद करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील विद्यार्थी शाळा प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत**

**(३१) * ३२३२० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील खाजगी शाळांनी आपल्या क्षमतेपेक्षा १४ हजार विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतरही साडेसहा हजार विद्यार्थी नववीच्या प्रवेशापासून वंचित राहिले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून यापैकी अधिक विद्यार्थी ग्रामीण आदिवासी भागातील असल्याने सदर विद्यार्थ्यांना शिक्षण सोडावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकाधिक विद्यार्थ्यांना नववीमध्ये प्रवेश देण्याबाबतचे पत्र जिल्हा परिषदेने सर्व शाळांना दिले असून मर्यादेपलीकडे विद्यार्थ्यांना सामावून घेता येणार नसल्याने खाजगी शाळांनी प्रवेश बंद केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद शाळांमध्ये नववी व दहावी इयत्ता सुरु करण्याचा निर्णय शासनाने न घेतल्याने सदर विद्यार्थी खाजगी शाळांमध्ये जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्हयातील नववीचे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये याबाबत तसेच ग्रामीण आदिवासी बहुल भागातील विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण घेण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) जि.प. शाळेतील इ. ८ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा इ. ९ वी मध्ये प्रवेशाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) जिल्हा परिषद शाळांना इ. ९ वी चा वर्ग सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**राज्यातील खाजगी शाळेतील ग्रंथपालांना पदवीधर वेतनश्रेणी देण्याबाबत**

**(३२) * ३१३७५ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शाळातील ग्रंथपाल यांना पदवीधर वेतनश्रेणी देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांनी सुमारे ३०० पेक्षा अधिक निकाल ग्रंथपालाच्या बाजुने देण्यात येवूनही अद्याप पदवीधर वेतनश्रेणीपासून ग्रंथपाल वंचित असल्याने याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद, पालघर यांनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन देवूनही ग्रंथपालाच्या मागण्या मान्य केल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ग्रंथपालांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

बी.एड. पदवीधर शिक्षकांप्रमाणे पदवीधर ग्रंथपालांना वेतनश्रेणी देण्याबाबतची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेने दिनांक १८/०१/२०१७ च्या निवेदनाद्वारे अध्यक्ष, राज्य वेतन सुधारणा समिती व शासनाकडे केली आहे.

(२) याप्रकरणी शासनाने पदवीधर ग्रंथपालांना अनुज्ञेय वेतनश्रेणीबाबत दिनांक १४ जून, २०१६ च्या परिपत्रकान्वये सविस्तर व सुस्पष्ट सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथे स्वस्त धान्य दुकानातील गव्हाची पोती घरात आढळल्याबाबत**

**(३३) * ३२२९० श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथे एका नवीन बांधकाम केलेल्या घरामध्ये ९२ स्वस्त धान्य दुकानातील गव्हाची पोती दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) पोलीस उपनिरिक्षक, औंढा नागनाथ व पोलीस निरिक्षक, उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय ग्रामीण हिंगोली यांच्या सोबत श्रीमती रतन संभाराव पोले, रास्त भाव दुकानदार, अहिल्यानगर, रा.औंढा, नागनाथ यांचे घरातील खोल्यांची पाहणी केली असता एका खोलीत ९२ कट्टे गहू आढळुन आले. तसेच त्यांच्या रास्त भाव दुकानाची पाहणी केली असता त्यामध्ये ५७ कट्टे गहू शिल्लक असल्याचे आढळून आले. दोन्ही जागेचा पंचनामा करण्यात येऊन जागेवर एकूण १४९ कट्टे गहू म्हणजेच ७४.५० क्विंटल गहू शिल्लक आढळून आला. पोलीस उपनिरिक्षक यांनी श्रीमती रतन संभाराव पोले व त्यास पर्यायी व्यवस्था असलेले श्रीमती संगीता मुळे या दोन्ही दुकानाचे अभिलेखे जप्त केले व रास्त भाव दुकानदार यांचा मुलगा श्री.मारोतराव संभाराव पोले यांचेविरुध्द औंढा ना. पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सौ.रतन संभाराव पोले, रास्त भाव दुकानदार, औंढा ना, ता.औंढा यांच्या रास्त भाव दुकानाचा परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्या दिनांक २७/०६/२०१७ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात येऊन १०० टक्के अनामत जप्त करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे काम ऑनलाईन करण्याबाबत**

**(३४) * ३१३८५ श्री.नारायण राणे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.अनिल परब, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या प्रलंबित निकालांवर उपाययोजना म्हणून कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी एप्रिलपासून उत्तरपत्रिका तपासण्याचे काम ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला असून, ऑनलाईन प्रक्रियेसाठी मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेला आवश्यक प्रतिसाद मिळाला नसल्याने मुंबई विद्यापीठात ऑनलाईन असेसमेंट अभावी मुल्यांकनाचे काम थांबले असल्याने दोन लाखाहून अधिक उत्तरपत्रिका पडून असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन उत्तरपत्रिका तपासणीकरिता (ऑन-स्क्रीन मार्किग ओएसएम) तांत्रिक साहाय्य पुरविणा-या कंपनीची नियुक्ती झाली नसतांना त्यासाठीचे प्रशिक्षण देण्यास मुंबई विद्यापीठाने सुरुवात केली मात्र प्रशिक्षण केंद्रावर पुरेसे संगणक किंवा इंटरनेट सुविधा उपलब्ध नसुन शिक्षकांच्या तांत्रिक स्वरुपाच्या शंकाचे विद्यापीठाकडून निरसन होत नसल्याने दिनांक २४ ते २८ एप्रिल, २०१७ या कालावधीत झालेल्या पाच दिवसाच्या प्रशिक्षणामधुन काय निष्पन्न होणार असा प्रश्न अध्यापकांना पडला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चर्चगेटपासून सिंधुदुर्गपर्यंतच्या जवळपास ५० केंद्रावर १२ हजारांहून अधिक अध्यापकांना हे प्रशिक्षण देण्यात येत आहे वास्तविक अभियांत्रिकी अध्यापकांना ऑनलाईन उत्तरपत्रिका मूल्यांकन करतांना अनेक अडचणी येत असल्याने त्यांनी याबाबत विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे मार्च-एप्रिल, २०१७ च्या पहिल्या सत्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या सर्व विद्या शाखांच्या विविध ४०६ परीक्षांच्या २२ लाख उत्तरपत्रिकांचे संगणकीय मुल्यांकन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यासाठी मेरीटट्रॅक या तांत्रिक सहकार्य पुरविणा-या कंपनीची निवड केल्यानंतर माहे मे, २०१७ अखेरपर्यंत २२ लाख उत्तरपत्रिकांपैकी केवळ ५० हजार उत्तरपत्रिकांचेच मुल्यांकन होऊ शकले असून माहे जुलै, २०१७ अखेरपर्यंत परिक्षांचे निकाल लागणे अशक्य असल्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम तसेच विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये यासाठी सदर निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

या साठी मुंबई विद्यापीठांतर्गत सुमारे ११,००० शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले असून त्याकरिता विद्यापीठाने इंटरनेट सुविधेसह पुरेसे संगणक उपलब्ध करुन दिले होते.

(३) अंशत: खरे आहे.

परंतु सदर अडीअडचणी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) आजमितीस एकूण ४७७ परीक्षांच्या निकालापैकी १०६ परीक्षांचे निकाल विद्यापीठाने जाहीर केले आहेत. विद्यापीठाकडून प्राप्त माहितीनुसार दि. २४/०७/२०१७ अखेर १७.६८ लाख उत्तरपत्रिकांपैकी ११.२६ लाख उत्तरपत्रिका तपासून झाल्या आहेत आणि २.८३ लाख उत्तरपत्रिकांच्या मॉडरेशनचे काम पूर्ण झालेले आहे.

(५) शासनाने मुंबई विद्यापीठाचे निकाल लवकरात लवकर लावण्यासाठी दि. ०६/०७/२०१७ रोजी मुंबई विद्यापीठाने स्थापन केलेल्या वॉररुम येथे उपस्थित राहून दैनंदिन देखरेख ठेऊन समन्वय करण्यासाठी विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोकण विभाग यांची नियुक्ती केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पांडे महाल (जि.भंडारा) वास्तूची विक्री केल्याबाबत**

**(३५) * ३२९४६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांडे महाल (जि.भंडारा) इतिहासकालीन वास्तूची शासकीय संकेतस्थळावर ऐतिहासिक किल्ला म्हणून नोंद असून त्यास पुरातत्व वास्तुचा दर्जा असतांना त्याची विक्री करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पांडे महाल विक्रीची रजिस्ट्री रद्द करावी या मागणीसाठी शहरातील सर्वपक्षिय संघटना व सामाजिक संस्था यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषंगाने वास्तू खरेदीदार व विक्रीदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. सदर वास्तु राज्य संरक्षित स्मारक नाही.

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लेन्सचा अत्यावश्यक औषधांच्या राष्ट्रीय यादीत समावेश करण्याबाबत**

**(३६) * ३२९५० श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोतीबिंदू व तत्सम शस्त्रक्रियेसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध कंपनीच्या लेन्सद्वारे रुग्णालयाकडून रुग्णांची फसवणूक सुरु असल्याचे निदर्शनास आले असून या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने विविध रुग्णालयाची तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरणाला माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच लेन्सच्या वर्गवारीचा अत्यावश्यक औषधांच्या राष्ट्रीय यादीत समावेश करावा अशी मागणी अन्न व औषध प्रशासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट** : (१) अन्न व औषध प्रशासनाने मोतीबिंदु वा तत्सम शस्त्रक्रियेसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध कंपनीच्या इन्ट्राअॅक्युलर लेन्स किंमतीबाबत चौकशी केली असता कुठेही MRP पेक्षा जास्त किंमत आकारल्याचे आढळून आलेले नाही.

तथापि रूग्णालयास व पुरवठादारांना आकारण्यात येणाऱ्या किंमती MRP पेक्षा खूप कमी असल्याचे आढळले. रूग्णालयास व पुरवठादारांना आकारण्यात येणाऱ्या किंमती व MRP मध्ये २०० ते ३०० टक्के तफावत आढळली.

इन्ट्राअॅक्युलर लेन्सच्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी इन्ट्राअॅक्युलर लेन्सचा समावेश अत्यावश्यक औषधांच्या राष्ट्रीय यादीत करण्याबाबत राष्ट्रीय औषध किंमत नियंत्रण प्राधिकरण, नवी दिल्ली यांना अन्न व औषध प्रशासनाकडून दिनांक ०५/०६/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) इन्ट्राअॅक्युलर लेन्सच्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी इन्ट्राअॅक्युलर लेन्सचा समावेश अत्यावश्यक औषधांच्या राष्ट्रीय यादीत करण्याबाबत राष्ट्रीय औषध किंमत नियंत्रण प्राधिकरण, नवी दिल्ली यांना अन्न व औषध प्रशासनाकडून दिनांक ०५/०७/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमराळे (ता.वसई) येथील खाजगी अनुदानित शाळेच्या व्यवस्थापकांनी दिशाभूल व फसवणूक केल्याबाबत

**(३७) * ३२६५५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायदयानुसार नमुना-दोन प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्यासाठी गटशिक्षण अधिकारी, वसई यांचे कार्यालयात दाखल केलेला प्रस्ताव मागे घेण्याबाबत उमराळे (ता.वसई) येथील खाजगी अनुदानित शाळेच्या व्यवस्थापकांनी दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या खूप कमी असून शिक्षकांचे वेतन, शालेय पोषण आहार व वेतनेतर अनुदान यासाठी दरवर्षी २० लाख रुपयांहून जास्त रक्कम शासनाला खर्च करावी लागत असून सदर नूतनीकरणाच्या प्रस्तावासोबत अनेक खोटी व बनावट कागदपत्रे दाखल करुन, शासनाची फसवणूक व दिशाभुल केल्याचे सदर निवेदन व त्यासोबतच्या कागदपत्रावरुन सिध्द होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळेच्या व्यवस्थापकांनी दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी दिलेले निवेदन मान्य करण्याबाबत व शाळेतील १४ विद्यार्थ्यांचे स्थलांतर/समायोजन जवळच्या उमराळे/सोपारे येथील जिल्हा परिषद शाळेत करण्याबाबत कार्यवाही करुन दोषी अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) या संदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पालघर यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे प्रयोजित आहे.

-----------------

**बडा पोखरण (ता.डहाणू, जि.पालघर) येथील नळ पाणीपुरवठा योजनेचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(३८) * ३२७४७ श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २२३६३ ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडा पोखरण (ता.डहाणू, जि.पालघर) पश्चिम किनारपट्टीवरील २९ गावे व ४ पाडयांना पाणीपुरवठा करणाऱ्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या नुतनीकरणासाठी रूपये ४३ कोटी मंजूर झाल्यानंतर काम सुरू होवून १० वर्षे झाली तरीही गावांना पाणी मिळत नसल्याने ग्रामस्थांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या दुरूस्तीचे काम मागील १० वर्षापासून प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही,

रुपये ४३.२८ कोटी ढोबळ किंमतच्या बडा पोखरण पाणीपुरवठा योजनेस दिनांक १४/११/२०१३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून, दिनांक ५/३/२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आले आहे. योजनेतील समाविष्ट ३३ गावांपैकी २९ गावांना चाचणी स्वरुपात पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी संस्थामधील तांत्रिक उपकरणे व संगणक कालबाहय झाल्याबाबत**

**(३९) * ३२१८१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तंत्रशिक्षण विभागामार्फत तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी संस्था चालविल्या जात असून सदर संस्थेत मागील २० वर्षापूर्वीची तांत्रिक उपकरणे व संगणके असून ती कालबाहय झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालबाहय झालेल्या उपकरणांवर विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात असल्याने विद्यार्थी व अध्यापकांना अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर उपकरणे बदलून अद्यावत उपकरणे घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) संस्थांची उपकरणांची मागणी व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रतिवर्षी सर्व संस्थांकरीता उपकरणे खरेदी करण्यास मान्यता दिली जाते. चालु आर्थिक वर्षात ४१९४ इतके संगणक खरेदी करण्यास मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात अनेक पीएच.डी. प्रबंध बोगस असल्याबाबत**

**(४०) * ३१०८३ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अर्ध्याहून अधिक पीएच.डी. प्रबंध बोगस असल्याचे वक्तव्य पुणे येथील एका कार्यक्रमात मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केले तसेच मोहनदास पै समितीच्या अहवालानुसार राज्यातील पीएच.डी. पैकी १.३ टक्के प्रबंधांचे संदर्भ (सायटेशन) वापरले जातात असेही मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस पीएच.डी. प्रबंधावर नियंत्रण ठेवण्याकरिता पीएच.डी प्रवेशासाठी नेट-सेट अनिवार्य करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार बोगस पीएच.डी. पदव्या देण्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यात अर्ध्याहून अधिक पीएच.डी. प्रबंध बोगस असल्याचे वक्तव्य पुणे येथील एका कार्यक्रमात केले हे खरे नाही.

तथापि, मोहनदास पै समितीचा अहवाल माझ्या निदर्शनास आणण्यात आला हे खरे आहे.
(२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात येते.
(३) रिसर्च कशा प्रकारे स्ट्रेंथनिंग करता येईल याबाबत शिक्षण तज्ञांशी विचारविनियम करण्यात आला असून याबाबतचे धोरण लवकरच ठरविण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उत्तम गल्वा मेटॅलिक कंपनीने (जि.वर्धा) पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन केल्याबाबत

**(४१) * ३३९४६ श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १४९९२ ला दिनांक १५ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तम गल्वा मेटॅलिक कारखान्याविरुध्द आवश्यक ती कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीच्या मागील बाजूस साठवणूक करण्यात आलेल्या स्लॅगची शास्त्रोक्त पध्दतीने कालबध्द कार्यक्रमांतर्गत विल्हेवाट लावण्यात आली असून दुषित घटकांचे उत्सर्जन होणार नाही अशा संमतीपत्राच्या अटी व शर्तीनुसार हवा व जल प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रभावी पध्दतीने चालविण्यात येत नसून औदयोगिक सांडपाणी सयंत्रणाची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्याबाबत सदर कारखान्याने कालबध्द कार्यक्रम सादर न केल्याने त्याची पूर्तता केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने उक्त कारखान्याची पाहणी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, वर्धा व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळेत समुपदेशकाची नियुक्ती करण्याबाबत**

**(४२) * ३२२०८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ टिकविण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक शाळेत समुपदेशकाची नियुक्ती करण्याची मागणी शिक्षक भारतीने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशा प्रकारची मागणी केल्याचे अद्याप निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपळगांव (जि.नाशिक) येथे पुणे विद्यापीठाच्या एफ.वाय.बी.एस.सी.च्या उत्तरपत्रिका रद्दीत सापडल्याबाबत

**(४३) * ३१६५० श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पुणे) या राष्ट्रीय मानांकित विद्यापीठाच्या एफ.वाय.बी.एस.सी.च्या उत्तरपत्रिका पिंपळगांव (जि.नाशिक) येथे रद्दीत सापडल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाविद्यालयामार्फत प्रथम वर्षाच्या मॅथेमॅटिक्सच्या उत्तरपत्रिका न तपासताच गुण देण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने विद्यापीठ व महाविद्यालयातील परीक्षा विभागावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान रोखण्याकरिता दोषी आढळून येणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) होय, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी डॉ. गजानन खराटे यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिती नियुक्त केली होती. सत्यशोधन समितीने सखोल चौकशी करुन कुलगुरु यांना दिनांक ०७ जुलै, २०१७ रोजी अहवाल सादर केला आहे. समितीचा अहवाल कुलगुरुंनी स्विकारला असून दोषींवर पुढील कार्यवाही करण्यासाठी दिनांक ०८/०७/२०१७ रोजी महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडयातील प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या संचमान्यतेतील चुका दुरुस्त करण्याबाबत

**(४४) * ३२४३४ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या संचमान्यतेत चुका झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संचमान्यतेतील चुका दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शिक्षण संचालनालय (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या स्तरावर शिबिरांचे आयोजन करुन संच मान्यता दुरुस्त करण्यात आल्या असून काही प्राप्त प्रस्तावांच्या छाननीचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथील धान्य गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४५) * ३३८४२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील धान्य गैरव्यवहारा प्रकरणी आरोपींना अटक करण्याबाबत व निलंबनाबाबत झालेल्या दिरंगाईची चौकशी करण्याचे आश्वासन मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे उक्त प्रकरणाची पुर्नचौकशी व दोषी तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे निलंबन व अटक करण्याबाबत कारवाई करावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकत्यांनी मुख्य सचिव, मुंबई यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वरील दोन्ही प्रकरणी सर्व दोषी अधिकाऱ्यांना अटक व निलंबन करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) परभणी येथील धान्य गैरव्यवहारा प्रकरणी चौकशी करण्याचे आश्वासन मा.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांनी सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले आहे.
(२) श्री. बालाजी काळे पाटील, सामाजिक कार्यकर्ता, परभणी यांनी तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे निलंबन व अटक करण्याची मागणी दिनांक ५/७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे केली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणात दिनांक १३/८/२०१६ रोजी गु.र.नं. ३०५/१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून श्री. दिलीप कच्छवे, जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी, श्री. संतोष रुईकर, तहसिलदार, परभणी, श्री. सि.बी. पांचाळ, नायब तहसिलदार (पुरवठा) परभणी, श्री. अनिल आंबेराव, गोदामपाल परभणी यांना निलंबित करण्यात आले आहे. उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

-----------------

**वणी (जि.यवतमाळ) येथील वर्धा नदीचे पात्र विषारी झाल्याबाबत**

**(४६) * ३४१३७ श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) येथील वर्धा नदीच्या तिरावर मातीचे ढिगारे उभे केले असून खाणीतून निघणारे रसायनयुक्त पाणी नदीच्या पात्रात सोडल्यामुळे नदीचे पात्र विषारी झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीपात्रापासून ३०० मीटर लांब अंतरावर हे मातीचे ढिगारे टाकणे गरजेचे असतांना नियमाचे उल्लंघन केले जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात तूर डाळीच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याबाबत**

**(४७) * ३१५४४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २३५४० ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तूर डाळीच्या दराचे नियंत्रण करण्याबाबत शासनाने तयार केलेल्या कायद्याच्या मसुद्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच केंद्र शासनाने सदर कायद्याच्या मसुद्यास मान्यता दिली नसल्यास केंद्र शासनाने त्यावर काय अभिप्राय दिले आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कायद्याच्या मसुद्यास केंद्र शासनाची मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्य शासनाने डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याचे प्रारुप तयार केले असून, दिनांक ०१/१२/२०१६ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर केले आहे. त्यास अनुसरुन केंद्र शासनाने अतिरिक्त माहिती मागितली आहे. त्याअनुषंगाने संबंधित विभागांकडून माहिती मागविण्यात आली असून, माहिती अद्याप अप्राप्त आहे. सदरची माहिती उपलब्ध झाल्यानंतर केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## सन २०१५-१६ च्या संच मान्यतेमध्ये त्रुटी आढळल्याबाबत

**(४८) * ३३०९३ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५-१६ या वर्षाच्या संच मान्यतेमध्ये असंख्य त्रुटी असल्याने या त्रुटी दुरुस्तीचे प्रस्ताव शिक्षण आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडे मागील ४ महिन्यापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्ताव दुरुस्ती करुन संच मान्यता मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) शिक्षण संचालनालय (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या स्तरावर शिबिराचे आयोजन करुन संचमान्यता दुरुस्त करण्यात आले असून काही प्राप्त प्रस्तावांच्या छाननीचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे स्वतंत्र फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन विद्यापीठ उभारण्याबाबत

**(४९) * ३१३३३ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक १८२२३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चित्रपट निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र चित्रपट विद्यापीठ उभारण्याचा निर्णय महामंडळाच्या संचालक मंडळाने घेतला असून चित्रपट निर्मितीसाठी लागणाऱ्या व शासनाच्या विविध विभागांकडून आवश्यक असणाऱ्या परवानग्या एकाच ठिकाणी प्राप्त व्हाव्यात, या उद्देशाने एक खिडकी योजनेची प्रगतीपथावर असलेली कार्यवाही पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चित्रपट विद्यापीठ व एक खिडकी योजनेबाबतची कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) तसेच नाशिक येथे भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांचे असलेले जन्मस्थान, तसेच गोरेगांवच्या धर्तीवर नाशिक येथे दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, या पार्श्वभुमीवर नाशिक येथे स्वतंत्र फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन विद्यापीठ उभारण्यात यावे, अशी मागणी कलाप्रेमीकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत, राज्य शासनाचा चित्रपट विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर विद्यापीठासाठी प्रस्तावित करण्यात आलेली जागा अद्याप महामंडळाच्या ताब्यात मिळालेली नाही.

चित्रपट निर्मिती, टि.व्ही. मालिका जाहिरात पट इत्यादींच्या चित्रीकरणासाठी निर्मात्यांना लागणाऱ्या सर्व परवानग्या, ऑनलाईन पद्धतीने सात दिवसांच्या आत एक खिडकी योजनेव्दारे परवानग्या देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत संबंधित विभागांचे अभिप्राय प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) चित्रपटसृष्टीसाठी प्रस्तावित जमीन सांस्कृतिक कार्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यास महसूल व वन विभागास विनंती करण्यात आली असून याबाबत त्या विभागाकडून जमीन हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाकडे नाशिक येथे स्वतंत्र फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन विद्यापीठ उभारण्याचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना जुनी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याबाबत**

**(५०) * ३३८१५ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २६८०६ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०१० च्या निर्णयान्वये अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली असून सदर योजनेच्या पूर्वीच्या कर्मचाऱ्यांचे समावेश शासनाने पूर्ण केले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या विना अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेत सेवा करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ व नागपूर खंडपीठ या ठिकाणी याचिका दाखल केल्या असून शासनाच्या विरोधात आंदोलने, उपोषणे केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालय यांनी याबाबत अंतरिम आदेश देऊन सदर याचिकाकर्त्यांना जुन्या भविष्य निर्वाह निधीचे सर्व लाभ देण्याबाबत आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेतील ४० टक्के रक्कम वार्षिक (ॲन्युईटी) खरेदी करण्यासाठी गुंतविणे अनिवार्य आहे, हे खरे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त योजना रद्द करुन जुनी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे. काही प्रकरणात अंतरिम आदेश दिले आहेत. तथापि, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्र.३४५८/२०१२ मध्ये व उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने ६७५/२०१४ मध्ये दिनांक २९/११/२०१० चा शासन निर्णय वैध ठरविला आहे.

(४) हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत

**(५१) * ३२४४४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ३०२८९ ला दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात पाणीपुरवठयाच्या विविध योजनांसाठी मागील १० ते १५ वर्षात कोट्यवधी रुपयांचा निधी असतानाही तालुका टँकरमुक्त करण्याबाबत प्रशासन अपयशी ठरल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील तालुक्यात धरण प्रकल्प जास्त प्रमाणात असतानाही केवळ नियोजनाअभावी धरणालगतच असलेल्या गावांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राजापूर तालुका टँकरमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

राजापूर तालुकास्तरीय अहवालानुसार माहे जून २०१७ अखेरपर्यंत राजापूर तालुक्यास पाणी टंचाई भासली नसल्याने तालुका टँकरमुक्त आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयात विविध तालुक्यातील पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(५२) * ३२४९० श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील १२ गावे व ७१ वाड्या, मुरुड तालुक्यातील ३३ गावे व १२ वाड्या, उरण तालुक्यातील ८ वाड्या, पनवेल तालुक्यातील १७ गावे व ४४ वाड्या, कर्जत तालुक्यातील ४४ गावे व ३६ वाड्या, खालापूर तालुक्यातील २६ गावे व ४० वाड्या, पेण तालुक्यातील ३९ गावे व १५४ वाड्या, श्रीवर्धन तालुक्यातील १९ गावे व ८१ वाड्या, सुधागड तालुक्यातील १० गावे व ३० वाड्या, रोहा तालुक्यातील ८ गावे, म्हसळा तालुक्यातील ७ गावे व २० वाड्या, माणगाव तालुक्यातील १६ गावे व ४० वाड्या, महाड तालुक्यातील ३६ गावे व २२० वाड्या आणि पोलादपूर तालुक्यातील ४८ गावे व २७२ वाड्यांमध्ये माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तीव्र पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील संभाव्य ५१ गावे आणि ११२ टंचाईग्रस्त वाडयांचा समावेश पाणी कृती आराखडयात केला असतानाही नागलोली, धनगरमलई, दिघी कोंढेपंचतन परिसरातील महिला/मुले पाण्याकरिता टँकरमागे धावत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हा प्रशासनाकडून तयार करण्यात आलेला पाणी टंचाई निवारण आराखडा शासनाकडे पाठविण्यात आला असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड जिल्हयात विविध तालुक्यातील पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) रायगड जिल्ह्याच्या सन २०१६-२०१७ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयात १५ तालुक्यांतील ३६७ गावे व ११०९ वाड्या अशा एकूण १४७६ गावे/वाड्यांचा समावेश करण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

(३) रायगड जिल्ह्याच्या सन २०१६-१७ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयानुसार रायगड जिल्ह्यात ग्रामपंचायती व गट विकास अधिकारी यांनी केलेल्या मागणीनुसार ३४ टँकरद्वारे ९० गावे व २९२ वाड्या अशा एकूण ३८२ गावे/वाडयांमध्ये माहे एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ पर्यंत पाणीपुरवठा करण्यात आला आहे. तसेच २३ गावे व ८० वाडया अशा एकूण १०३ गांवे/वाडयांमध्ये विंधन विहीरी घेण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे टंचाई अंतर्गत आवश्यक त्या उपाययोजना करुन रायगड जिल्हयातील पाणी टंचाईग्रस्त गांवे/वाडया यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अजित पवार कनिष्ठ महाविद्यालय, बोरिवली (मुंबई) यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(५३) * ३२७६० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजित पवार कनिष्ठ महाविद्यालय, बोरिवली (मुंबई) यांनी अकरावीसाठी ऑफलाईन प्रवेश दिल्याने कारवाई झालेल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना अनधिकृत गुणपत्रिका देण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्राचार्यांकडून छळ सुरु असल्याबाबत पालकांकडून शासनास तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार उक्त दोषी महाविद्यालयाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) फी परत करण्यात यावी याबाबत विद्यार्थ्यांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून सदर कनिष्ठ महाविद्यालयाची मान्यता काढून टाकण्यात आली आहे व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याबाबत संस्थेस कळविण्यात आले आहे. संस्थेने याविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याबाबत

**(५४) * ३२७७९ श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक २८७०३ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षक कर्मचा-यांना शासकिय व अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचा-यांना लागू करण्यात आलेल्या वेतन आयोगानुसार वेतन मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वेतनातील तफावत दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचा-यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या निकषानुसार वेतन देण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांच्या व्यवस्थापनाची असून शिक्षक व कर्मचा-याच्या वेतन व सेवाविषयक बाबी संबंधित विद्यापीठाच्या अखत्यारीत येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**स्वदेश फाऊंडेशन संस्थेने सामाजिक दायित्वमधून निकृष्ट कामे केल्याबाबत**

**(५५) * ३११८२ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध कार्यालयांना ट्रेनिंग प्रोग्रामसाठी शासनाने स्वदेश फाऊंडेशन (जि.रायगड) या सेवाभावी खाजगी संस्थेबरोबर करार केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांच्या माध्यमातून शिक्षक, मुख्याध्यापक यांचेसाठी स्वदेश फाऊंडेशन संस्थेमार्फत शासनाच्या नावाने प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्था राज्यातील बहुतांश विविध कंपन्यांकडून या कामासाठी सामाजिक दायित्व (CSR Fund) म्हणून निधी घेत असून त्या प्राप्त निधीमधून सदर संस्थेने शाळांना पुरविलेली साधनसामुग्री निकृष्ट दर्जाची तर शाळा इमारत तत्सम कामासाठी केलेली बांधकामे निकृष्ट दर्जाचे झाले असून विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका असल्याच्या तक्रारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, जिल्हाधिकारी, रायगड, शिक्षण आयुक्त, पुणे, मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे माहे, डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वदेश फाऊंडेशन संस्थेला विविध कंपन्यांकडून CSR Fund म्हणून एकूण किती निधी प्राप्त झाला व केव्हापासून तसेच त्यापैकी प्रत्यक्षात किती खर्च झाला, याबाबतची माहिती संस्थेने जिल्हाधिकारी, रायगड यांचेसह कोणत्याही यंत्रणेला उपलब्ध करुन दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित स्वदेश फाऊंडेशन या संस्थेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्यादृष्टीने शाळांमध्ये शिक्षकांची संख्या वाढविण्याबाबत

**(५६) * ३१५९५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एक शिक्षकी शाळा ही संकल्पनाच कालबाह्य ठरलेली असताना सुमारे ३ हजार ३१५ शाळा एक शिक्षकी असल्याचे नुकतेच निदर्शनास आले असून आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या आणि राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहरात सुमारे ४९ शाळा एक शिक्षकी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ व दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार पहिली ते पाचवीची विद्यार्थी संख्या ६० पर्यंत असेलतर त्या शाळेस दोन शिक्षक देण्यात यावेत आणि त्याच शाळेत इयत्ता सहावी ते आठवी पर्यंत प्रत्येकी एक विद्यार्थी जरी शिकत असला तरी त्या शाळेत दोन शिक्षक देण्यात यावेत असा कायदा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्यादृष्टीने शाळांमध्ये शिक्षकांची संख्या वाढविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) उपरोक्त प्रकरणी शासन निर्णय दिनांक २८/८/२०१५ आणि परिपत्रक दिनांक ८/१/२०१६ मधील सन २०१५-१६ व सन २०१६-१७ ची संचमान्यता करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(५७) * ३२०९९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी दरवर्षी रुपये ३५ ते ४० कोटींची तरतूद करण्यात येत असताना सन २०१७-२०१८ या वर्षात फक्त रुपये २८ कोटी एवढी तरतूद करण्यात आली असल्याने अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागणार असल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचे पुरेशा शिष्यवृत्त्यांअभावी शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही, राज्य शासनाकडून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.१००.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आश्वासित प्रगती योजनेंतर्गत खाजगी अनुदानित प्राथमिक शाळेतील लिपीकांना पदोन्नतीची संधी नसल्याबाबत

**(५८) * ३३१३१ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक २७२१० ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १ एप्रिल, २०१० रोजी शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी, महाविद्यालयीन चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे २४ वर्षानंतर आश्वासित प्रगती योजना लागू केली असून उक्त योजनेतून शासन मान्य अनुदानित खाजगी माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचा-यांना वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच आश्वासित प्रगती योजनेंतर्गत खाजगी अनुदानित प्राथमिक शाळेतील लिपीकांना पदोन्नतीची संधी नाही म्हणून २४०० रुपयांऐवजी २१०० रुपये ग्रेड पे वेतन मंजूर करण्यात आले असल्याचे माहे मे, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे काय,

(३) असल्यास, माध्यमिक शाळांतील लिपीकांना २४०० रुपये एवढा ग्रेड पे मंजूर करण्यात येत असून प्राथमिक शाळांतील लिपीकांना आणि माध्यमिक विभागातील लिपीकांना देण्यात येणाऱ्या वेतनश्रेणीमध्ये विसंगती असण्याचे कारण काय तसेच योजनेचा लाभ मिळण्याबाबत शिक्षकेतर संघटना व शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार मागणी केली असल्याने शासनाने यापूर्वी लोकप्रतिनिधींना सदर योजना संबंधितांना लागू करण्याचे सभागृहात आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात ग्रामीण भागातील मराठी शाळा बंद झाल्याबाबत**

**(५९) * ३३२७३ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या संचमान्यतेनुसार एका शाळेला एक मुख्याध्यापकाऐवजी १०० विद्यार्थ्यांमागे एक मुख्याध्यापक असा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी माध्यमाच्या शाळा विद्यार्थी संख्येअभावी बंद पडत असताना संचमान्यतेच्या नविन निर्णयानुसार शाळा प्रमुखाचे पद रद्द झाल्यास राज्यातील मराठी भाषिक शाळा वर्षागणिक बंद होण्याचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामीण भागातील मराठी शाळा बंद होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

असा निर्णय २८ ऑगस्ट, २०१५ रोजी घेण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती विद्यापीठाच्या बी.ए. प्रथम वर्ष अभ्यासक्रमातुन पुत्रप्राप्तीची माहिती शिकविण्यात येत असल्याबाबत

**(६०) * ३१२१८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विद्यापीठाच्या कलाशाखेच्या प्रथम वर्ष बी.ए. च्या इतिहासाच्या पुस्तकातुन पुत्रप्राप्तीबाबतची माहिती शिकवली जात असून गर्भधारणेपुर्वी व प्रसवपुर्व लिंगनिवडीस प्रतिबंध कायद्याचा भंग असल्याच्या तक्रारीवरुन राज्याच्या आरोग्य विभागाच्या अतिरिक्त संचालकानी अमरावती जिल्हा शल्य चिकित्सकांना योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिनांक २७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठास तक्रार किंवा निवेदन प्राप्त झालेले नाही. तसेच अमरावती विद्यापीठाच्या कला शाखेच्या प्रथम वर्ष बी. ए. च्या इतिहासाच्या क्रमिक पुस्तकात पुत्रप्राप्तीबाबत कोणत्याही प्रकारचा समावेश नाही.

याबाबतची तक्रार अतिरिक्त संचालक आणि मा.आयुक्त (आ.से.) यांचेकडे प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने अतिरिक्त संचालक यांनी दिनांक १६/०५/२०१७ च्या पत्रान्वये जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती तथा समुचित प्राधिकारी यांना योग्य ती कार्यवाही करण्यासाठी निर्देशित केले होते.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१/०७/२०१७ रोजी समिती गठित करण्यात आली असून पुढील ३ दिवसात जिल्हास्तरीय दक्षता समितीपुढे चौकशी अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयात खाजगी शाळांनी पालकांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(६१) * ३३९४० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात खाजगी शाळेत प्रवेश देताना इमारत निधी शुल्काच्या नावाखाली पालकांची आर्थिक फसवणूक केली जात असून शासनाच्या निर्णयानुसार ६ ते १४ वर्षाच्या मुलामुलींना मोफत शिक्षण देण्याचे धोरण असताना देणगीच्या नावाखाली पालकांकडून पैसे घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी शाळांचा नियमबाहृय कारभार थांबवण्याकरिता कार्यवाही करुन दोषी शाळांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) बीड जिल्हयातील काही शाळांच्या बाबतीत इमारत निधीच्या नावाखाली फी घेत असल्याबाबत पालकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) याबाबत जिल्हास्तरीय चौकशी समितीकडून चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय, विक्रमगड (शिळ) (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील जागेवर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(६२) * ३४०१३ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय, विक्रमगड (शिळ) (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील जागेवर प्राचार्याच्या सहमतीने जागेचा व्यावसायिक वापर होत असल्याने अतिक्रमण झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्याबाबत**

**(६३) * ३१७६७ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक २६८३७ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६ जिल्हयात प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत असल्याचे सन २०१२ ते २०१७ या कालावधीत यू-डायस (जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली) अहवालावरुन दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये २ लक्ष ४० हजार विद्यार्थ्यांची घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) प्राथमिक शिक्षण हा मुलभूत हक्क आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण व शैक्षणिक दर्जा वाढ यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या प्रकल्पाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येत आहे. राज्यातील एकही मुल अप्रगत राहू नये, असे शासनाचे उद्दिष्ट आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या शाळांमधील इयत्ता आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात तीन शैक्षणिक प्रगती चाचण्यांचे आयोजन करण्यात येईल. प्रगती तपासणीसाठी चाचण्या घेण्यात येत असून ज्या विषयामध्ये/ क्षमतेमध्ये विद्यार्थ्यांना अडचणी येत असतील त्यासाठी कृती कार्यक्रम आखण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयात दूषित पाण्याचा पुरवठा झाल्याबाबत

**(६४) * ३३१०८ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात मागील दहा महिन्यात ९० गावांमध्ये पिण्याचे पाणी दूषित आढळून आले असून अनेक गावांत दूषित पाण्यामुळे जलजन्य आजाराची लागण झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिंगोली जिल्हयात दुषित पाणीपुरवठा होवू नये याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

हिंगोली जिल्हयातील मागील दहा महिन्यात ४६१८ पाणी नमुन्यांची तपासणी प्रयोगशाळेत करण्यात आली होती. यापैकी १०६० पाणी नमुने दुषित आढळून आले होते. जिल्हयातील औढा नागनाथ, वसमत, हिंगोली व सेनगांव या तालुक्यामध्ये कुठल्याही प्रकारचे जलजन्य आजार उद्भवलेले नाहीत. तथापि, कळमनुरी तालुक्यातील ग्राम पंचायत, फुटाणा येथील नळ योजनेमध्ये गावातील पाच ठिकाणी पाईपलाईनला गळती असल्यामुळे गॅस्ट्रोसदृश्य १५ रुग्ण आढळून आले होते. त्यानंतर प्रशासनाकडून रुग्णास औषधोपचार करण्यात आला व गावातील नागरीकांना शुध्द पाणीपुरवठा करण्यात आला.

(२) दुषित पिण्याचे पाणी आढळून आलेल्या गावामध्ये सर्व स्त्रोतांचे ब्लिचींग पावडर टाकून शास्त्रोक्त पध्दतीने शुध्दीकरण करण्यात आले. पिण्याच्या पाईपलाईनची गळती दुरुस्त करण्यात येऊन, स्त्रोताचा परिसर स्वच्छ करण्यात आला. ग्राम पंचायत, फुटाणा, ता.कळमनुरी येथे ब्लिचींग पावडरचा साठा उपलब्ध करुन देण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सापेतर्फे तुडील (ता.महाड, जि.रायगड) येथील नागेश्वरी नदी दूषित झाल्याबाबत

**(६५) * ३४०२४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सापेतर्फे तुडील (ता.महाड, जि.रायगड) येथील नागेश्वरी नदीत एम.आय.डी.सी.चे रसायनयुक्त पाणी शिरल्यामुळे नदी दूषित झाली असून सदरहू गावाला उक्त नदीतून पिण्याच्या पाण्याचा पाणीपुरवठा केला जात असल्याने व पाणीपुरवठा करणारी पाईप लाईनही दुषित पाण्यामुळे खराब झाली असल्याने नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागेश्वरी नदीमध्ये सांडपाणी जावू नये म्हणून एम.आय.डी.सी.मार्फत सन २००२-२००३ मध्ये रावढळ येथे बंधारा बांधण्यात आला, मात्र सन २००८ मध्ये महामंडळाकडून रुपये २०,३३,३७५/- अदा करुन व

करारनामा करुन सदर बंधारा बांधण्याचे व देखभाल दुरुस्तीचे काम ग्रामपंचायत लोअर तुडील यांच्याकडे देण्यात आले तथापि, ग्रामपंचायतीचा महसूल फार कमी असल्याने सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कामे ग्रामपंचायतीला शक्य नसल्याने सदरहू बंधारा दुरुस्ती झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोअर तुडील ग्रामपंचायतीसमवेत अशा प्रकारचा करारनामा करताना त्या जवळील बांधित सापेतर्फे तुडील या गावाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना अशा प्रकारचे कोणतेही प्रमाणपत्र किंवा संमती एम.आय.डी.सी. प्रशासनाने घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू गावाला पाणीपुरवठा करणारी पाईप लाईन दुरुस्त करुन झालेल्या नुकसानीची भरपाई एम.आय.डी.सी. प्रशासनाने करावी तसेच उक्त बंधारा दुरुस्ती सुध्दा एम.आय.डी.सी. प्रशासनाने करावी अशा प्रकारचे पत्र पंचायत समिती सदस्या यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी दिले असून या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

या संदर्भात दि. ९/०१/२०१७ रोजी महामंडळाकडे पंचायत समिती सदस्या, महाड यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

महामंडळाने नागेश्वरी खाडीवर सन २००२-२००३ मध्ये बंधारा बांधण्याचे काम पूर्ण केले व सन २००७ पर्यत बंधाऱ्यांची देखभाल व दुरुस्ती महामंडळाकडून करण्यात येत होती. ग्रामपंचायत, लोअर तुडील यांच्या मागणीनुसार सदर बंधारा सन २००८ साली महामंडळाकडून रोख रक्कम रुपये २०,२३,३७५/- अदा करुन व करारनामा करुन पुढील देखभाल दुरुस्तीसाठी कायमस्वरुपी ग्रामपंचायत, लोअर तुडील यांना हस्तांतरीत करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सर्व ग्रामपंचायतीमार्फत सदर बंधाऱ्याची नियमित देखभाल व दुरुस्तीबाबतची हमी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, महाड यांचेमार्फत दि. २६/११/२००२ च्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे.

(४) व (५) होय. सदर बंधारा महामंडळातर्फे दुरुस्ती करुन मिळावा, असे निवेदन ग्रामपंचायत, लोअर तुडील यांनी दिनांक १/०४/२०१७ च्या पत्रान्वये केले आहे.

महामंडळाने ग्रामपंचायतीशी केलेल्या करारनाम्याप्रमाणे सन २००८ पासून बंधाऱ्याची देखभाल व दुरुस्ती महामंडळाच्या अखत्यारित येत नसल्याने संबंधित यंत्रणेस याबाबत कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

-----------------

**श्री मावळी मंडळ (ठाणे) इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या व्यवस्थापनेवर कारवाई करण्याबाबत**

**(६६) * ३२९५२ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री मावळी मंडळ (ठाणे) इंग्रजी माध्यमाच्या शाळा व्यवस्थापनाने यंदाच्या वर्षी शाळेतूनच गणवेश खरेदी करण्याची सक्ती केली असून सदरच्या गणवेशाचा दर्जा निकृष्ठ असून किंमत जास्त दराने असल्याची तक्रार तेथील पालकांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक ६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळा व्यवस्थापनेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) या संदर्भातील तक्रार शिक्षणाधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी शिक्षणाधिकारी, ठाणे महानगरपालिका, यांचेकडून चौकशी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वांद्रे, मुंबई येथील शासकीय तंत्र निकेतन वसतिगृहाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(६७) * ३३९२० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे, मुंबई येथील शासकीय तंत्र निकेतनचे विद्यार्थी जे.जे.च्या वांद्रे (पूर्व) येथील वसतिगृहात राहत असून सदर इमारतीची दूरवस्था झाली असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतींना तडे गेले आहेत तसेच कोणत्याही क्षणी छत कोसळण्याचा धोका असून इतरही अनेक दूरवस्था असल्याने सदरहू इमारतींमध्ये विदयार्थी जीव मुठीत घेऊन राहत असून विदयार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असल्याने या विदयार्थ्यांनी तंत्र शिक्षण संचालनालयावर मोर्चा काढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) नाही.
(३) सर जे.जे. वास्तुशास्त्र, वसतिगृह, बांद्रा येथील इमारतीच्या मजबुतीकरणाचे व दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याबाबत शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई या संस्थेने दिनांक १०/०४/२०१७ व दिनांक २७/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये अधिक्षक अभियंता, सा.बां.वि. यांना कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सर्व शिक्षा अभियानासाठी उपलब्ध करुन दिलेला**
**निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(६८) * ३१२४४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्व शिक्षा अभियानाचे विविध उपक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून गतवर्षात राज्यातील ३४ जिल्ह्यात १ हजार ८९४ कोटी ८४ लाखांचा निधी प्राप्त झाला असून त्यापैकी १ हजार ५३९ कोटी ७२ लाखांचा निधी खर्च झाल्याने सुमारे ६१३ कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिला असल्याचे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या माहितीच्या अधिकारात माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सन २०१६-१७ साठी राज्यातील २३ महानगरपालिकांना केंद्राकडून १४२ कोटी ९६ लाखांचा निधी देण्यात आला असताना, त्यातील फक्त ४६ कोटी ७७ लाखांचा निधी खर्च करण्यात आल्याने रुपये ९६.१६ कोटी अखर्चित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील जिल्हा परिषद शाळेत पोषण आहार करणाऱ्या स्वयंपाकी व मदतनीस यांना थकीत मानधन देण्याबाबत

**(६९) * ३२१८२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील जिल्हा परिषद शाळेत पोषण आहार करणाऱ्या स्वयंपाकी व मदतनीस यांना मागील ५ महिन्यापासून मानधन मिळाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद जिल्हयात ६२९० स्वयंपाकी व मदतनीस कार्यरत असून मानधन न मिळाल्याने त्यांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वयंपाकी व मदतनीस यांना थकीत मानधन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत औरंगाबाद जिल्हयातील कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे माहे ऑक्टोबर, २०१६ ते माहे मार्च, २०१७ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले असून माहे ऑगस्ट, २०१७ पर्यंतचे मानधन अदा करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील शाळांनी सन २०१७-१८ शैक्षणिक
वर्षात शुल्क वाढ केल्याबाबत**

**(७०) * ३१०८८ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील १८ शाळांनी सन २०१७-१८ शैक्षणिक वर्षात शुल्कवाढ केली असून शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांना सक्ती करण्यात येत असल्याने पालकांनी याबाबत शाळेविरुध्द तक्रार केलेली असून अद्यापपर्यंत शाळांवर कोणतीच कारवाई केली जात नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शुल्कवाढ करणाऱ्या १८ शाळांवर तसेच शालेय साहित्य खरेदीसाठी पालकांवर सक्ती करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) पुणे शहरातील १८ शाळांनी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शुल्कवाढ केली असून त्या शाळांविरुध्द तक्रार केली आहे हे खरे आहे.

(२) यासंदर्भात विभागीय शुल्क नियामक समितीपुढे तक्रारींच्या अनुषंगाने सुनावणीचे कामकाज व आवश्यक कार्यवाही सुरु आहे. यापैकी ४ शाळा व्यवस्थापनांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील शासकीय धान्य गोदामातील
गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(७१) * ३४२३० श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील शासकीय धान्य गोदामातील गैरव्यवहारावर नियंत्रण ठेवण्याबाबत सिटीझन फॉरम हयुमन राईट या संघटनेद्वारे मागणी करण्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माळशिरस तालुक्यातील नातेपुते, अकलूज येथील शासकीय धान्य गोदामाच्या सोसायट्या नसताना हमालीचे बनावट शासकीय देयक सादर करुन शासनाची दिशाभूल केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोदामातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. माळशिरस तालुक्यातील शासकीय धान्य गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीची कामे करणाऱ्या तीन हमाल कंत्राटदार संस्थांची नोंदणी सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून रद्द करण्यात आली होती. मात्र त्यापैकी दोन संस्था पुन्हा पुनर्जिवीत करण्यात आल्या आहेत. रद्द करण्यात आलेल्या संस्थेची कोणतीही देयके अदा केलेली नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात कला, क्रीडा अतिथी शिक्षकांना सेवेत कायम करण्याबाबत**

**(७२) * ३२२१३ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कला, क्रीडा अतिथी शिक्षकांना सेवेत कायम करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाचा निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कला, क्रीडा अतिथी शिक्षकांना सेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**येवला (जि.नाशिक) तालुक्यात टंचाईग्रस्त गावांसाठी पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(७३) * ३१८०२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांसाठी नांदूरमध्यमेश्वर एक्सप्रेस कालव्यामधून नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तयार करण्याकरिता पूर्णव्यवहार्यता अहवाल तयार करुन शासनास सविस्तर प्रस्ताव सादर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी व दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनास पूर्णव्यवहार्यता अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अहवालामधील मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रस्तुत मागणी केलेल्या योजनेची व्याप्ती व गावांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने सद्य:स्थितीत पिण्याच्या पाण्याची उपलब्ध साधने व होणारा दरडोई पाणीपुरवठा इ. बाबतची माहिती संबंधित ग्रामपंचायत व गटविकास अधिकारी यांचेकडून दिनांक १०/०७/२०१७ रोजी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक यांना उपलब्ध झाली आहे. त्यानुसार व्यवहार्यता अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास मंजुरी देण्याबाबत**

**(७४) * ३२४३५ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २३८४९ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनाकडे दिड वर्षापासून प्रलंबित असल्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बढती भरतीवर अद्याप बंदी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी येथील सर्व्हे नं २५० व २५५ वक्फ मालमत्तेची चौकशी करण्याबाबत**

**(७५) * ३३८७६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील सर्व्हे नं. २५० व २५५ हे वक्फ मालमत्ता असून त्याची नोंद महाराष्ट्र राजपत्रात मस्जीद मुलतान म्हणून घेण्यात आली असून सदरील वक्फ मालमत्तेची मुतवली व त्यांचे वारसदार हे नियमबाहयरित्या प्लॉटींग व खरेदी-विक्री व्यवहार करीत असल्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान त्यांना नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार वक्फ मालमत्तेच्या विक्रीची परवानगी नसतांना विक्री करण्यात आलेल्या मालमत्तेचे खरेदी विक्रीचे करार रद्द करून सदरील मालमत्ता वक्फ मंडळाच्या ताब्यात घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फसवणुक झालेल्या गोरगरीब जनतेची रक्कम परत देण्याबाबत कार्यवाही करुन संबंधिताविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने सादर केलेल्या अहवालानुसार परभणी येथील सर्वे नं.२५० व २५५ या वक्फ मालमत्तेची संबंधित मुतवल्ली व त्यांच्या वारसदारांकडून नियमबाहयरित्या प्लॉटींग करुन विल्हेवाट लावण्यात येत असल्याचे प्रकरण वक्फ मंडळात १९८७ सालापासून सुरु आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दुसरे अपील क्र.२१५/२००१ दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तथापि, सदर प्रकरणी माहे जून, २०१५ मध्ये व त्यादरम्यान संबंधितांना जिल्हाधिकारी, परभणी यांनी नोटीस बजावलेली नाही.

(२) प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(७६) * ३१८५१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात साडेचार हजारपेक्षा जास्त अनधिकृत कत्तलखाने असून त्यामध्ये बोकड व कोंबडयांची बेकायदेशीर कत्तल सुरु असून एकाही अनधिकृत कत्तलखान्यावर अन्नसुरक्षा कायदा २०११ अंतर्गत कारवाई केली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यभरातील अनधिकृत कत्तलखान्यांमध्ये स्वच्छता व आरोग्याचे कोणतेही निकष पाळले जात नसून कापण्यात येणारे जनावर हे खाण्यायोग्य असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र घेतले गेले नसल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील कत्तलखान्यांची नोंद ही अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत अन्न व औषध प्रशासनाकडे बंधनकारक असताना त्यांची अंमलबजावणी होत नसून अन्न व औषध प्रशासनाकडे असलेल्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे उक्त प्रकरणी कारवाई होत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाई करुन अन्न व औषधे प्रशासनाकडे आवश्यक मनुष्यबळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशतः खरे आहे. दिनांक २१/०५/२०१७ रोजीच्या वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे. तथापि अनधिकृत कत्तलखान्यांवर अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई केली जात नाही ही बाब खरी नाही. अनधिकृत कत्तलखाना आढळल्यास त्याला परवाना घेण्यासाठी बाध्य करण्यात येते.

(२) अशा प्रकारची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) हे अंशतः खरे आहे

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ४६ अन्न सुरक्षा अधिकारी व १९ सहायक आयुक्त (अन्न) या पदांसाठी उमेदवारांची शिफारस केली असून त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. त्यानंतर सदर विषयाबाबत भरीव कार्यवाही करता येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे संतपीठ स्थापन करण्याबाबत**

**(७७) * ३१३३५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४३६१ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण येथे स्थापन करण्यात आलेले संतपीठ कार्यान्वित करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संतपीठ कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने संतपीठ योजना हा विषय सांस्कृतिक कार्य विभागाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पैठणप्रमाणेच त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे संत निवृत्ती महाराजांची समाधी आणि शहराचे धार्मिक, पौराणिक, सांस्कृतिकदृष्टया असलेले महत्व पाहता त्र्यंबकेश्वर व राज्यात अन्यत्र संतपीठ स्थापन करण्यासंदर्भात शासनाकडून कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे वा येणार आहे,

(४) नसल्यास, उपरोक्त प्रकरणाबाबतची कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे व याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) संतपीठ कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने "संतपीठ योजना" हा विषय सांस्कृतिक कार्य विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु असून ती अंतिम टप्प्यात आहे.

(३) व (४) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तसेच राज्यात अन्यत्र संतपीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठाच्या नियमबाह्य कारभारावर नियंत्रण ठेवण्याबाबत**

**(७८) * ३२६०२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिक्षांत प्रमाणपत्रावरील नावे चुकवल्यानंतर परीक्षा विभागाच्या पोस्टल घोळाने विद्यार्थी त्रस्त झाले असून मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा विभागातर्फे टपालाद्वारे पाठविलेल्या दिक्षांत प्रमाणपत्राच्या पाकीटात ठाणे येथे राहणाऱ्या प्रदीप बनसोडे यांना दुसऱ्याच विद्यार्थ्याचे प्रमाणपत्र आढळून आल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोस्टाने आलेल्या पाकिटावर विद्यापीठाने "दुमडू नये" असे स्पष्ट लिहिले असतानाही पाकिटाला अनेक घडया पडल्याच्या तक्रारीही विद्यार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यापीठाच्या नियमबाह्य कारभाराबाबत कार्यवाही करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

श्री. प्रदीप बन्सोडे यांनी त्यांना दूसऱ्या विद्यार्थ्याचे प्रमाणपत्र पाठविल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांना त्यांचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मेसर्स पीओमा केमिकल्स औषध उत्पादन कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(७९) * ३२७७४ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (ठाणे) येथील मेसर्स पीओमा केमिकल्स औषध उत्पादन कंपनीच्या गोदामावर अन्न व औषध प्रशासनाने छापा टाकून लॅक्टिटोल मोनोहायर्डेट औषधाचा १२,७३० किलोचा साठा दिनांक २७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडून परवानगी घेणे बंधनकारक असतानाही परवानगी न घेता अन्य देशातून औषधांची आयात करुन, औषधांची बेकायदा विक्री केली असून सदरहू छाप्यात ४० लाखांचा माल जप्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दोषी कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) अन्न व औषध प्रशासन विभागाव्दारे दिनांक १६/०५/२०१७ रोजी मे. पिओमा केमिकल्स, विलेपार्ले, मुंबई या घाऊक औषध विक्री करणाऱ्या पेढीची तपासणी करण्यात आली. तपासणीच्यावेळी सदर जागेत कुठलाही औषध साठा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. सदर पेढी औषध साठा त्यांच्या भिवंडी येथील गोदामामध्ये साठवित असल्याचे त्यांनी तपासणीच्यावेळी सांगितले. सदर संस्थेच्या भिवंडी येथील गोदामाची तपासणी केली असता तेथे लॅक्टिटोल मोनोहायर्डेट औषधाचा १२,७३० किलोचा साठा आढळून आला. सदर कंपनीने लॅक्टिटोल मोनोहायर्डेट या औषधाच्या आयातीसाठी आयात परवाना घेणे बंधनकारक असतानाही आयात परवाना न घेता केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांकडून Dual use NOC घेऊन सदर औषध आयात केले असून त्याची विक्री औषधी पाठ उत्पादन करणाऱ्या संस्थाना केल्याचे तपासणी दरम्यान निदर्शनास आले. तपासणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने लॅक्टिटोल मोनोहायर्डेट औषधाच्या १२७३० किलो साठ्यातून १ नमुना विश्लेषणासाठी ताब्यात घेऊन उर्वरीत साठा प्रतिबंधित करण्यात आलेला आहे.

(३) आयातीसाठी परवाना घेणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने सदर प्रकरणी केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांना कळविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आलेल्या नमुन्याचा विश्लेषण अहवाल प्रतिक्षाधीन आहे. विश्लेषण अहवाल प्राप्त होताच, पेढीत तपासणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने पेढीवर नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग व मुरुड (जि.रायगड) तालुक्यात सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून बेकायदेशीर इमारती बांधल्याबाबत

**(८०) * ३४१९७ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक २६७२० ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग व मुरूड (जि.रायगड) तालुक्यात बाहेरील धनाढ्य लोकांनी शेतघर बांधण्याच्या नावाखाली सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून विना परवानगी बेकायदेशीर प्रशस्त इमारती बांधल्या असून सदर इमारतींवर कारवाई न करता वापरात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून बांधण्यात आलेल्या इमारतींवर महसूल विभागाने इमारती जैसे थे ठेवून संबंधितांचे वॉलकंपाऊंड तोडून शुल्लक कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) अलिबाग व मुरुड (जि.रायगड) तालुक्यामध्ये बाहेरील धनाढय लोकांनी शेतघर बांधण्याच्या नावाखाली सी.आर.झेड. कायद्याचे उल्लंघन करुन विना परवानगी प्रशस्त इमारती बांधल्या आहेत, हे खरे आहे.

तथापि, अशा बेकायदेशीर इमारतींवर कारवाई न करता, सदर इमारती वापरात येत आहेत, हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) अलिबाग व मुरुड तालुक्यातील समुद्रकिनारी बांधण्यात आलेल्या अनुक्रमे १४५ व १६७ बांधकाम धारकांना महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ तसेच, पर्यावरण (संरक्षण) कायदा, ११९८६ चे कलम ३ (१) व १५ अन्वये संबंधित तहसिलदारांकडून नोटीस बजावण्यात आल्या आहेत. सदर नोटीसींच्या अनुषंगाने संबंधितांनी मा.जिल्हा न्यायालय, अलिबाग येथे दावे दाखल केले असून, सदर दाव्यांपैकी अलिबाग तालुक्यातील ६१ व मुरुड तालुक्यातील १०१ दाव्यांमधील अनधिकृत बांधकामाबाबत मा.न्यायालयाने तात्पुरते स्थगिती आदेश दिले आहेत.

सदर दोन्ही तालुक्यातील अनधिकृत बांधकामांपैकी अलिबाग तालुक्यातील ६९ व मुरुड तालुक्यातील ९५ प्रकरणांमध्ये महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ व केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक ०६/०१/२०११ रोजीच्या अधिसूचनेमधील निदेशांचे उल्लंघन केल्यांने संबंधितांविरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम ३ (१) व १५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

----------------

**दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात पाण्याच्या स्त्रोतांचे शुध्दीकरण करण्याबाबत**

**(८१) * ३१६४० ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तालुका आरोग्य विभागाकडून प्रत्येक महिन्यात सार्वजनिक वापर होत असलेल्या पाण्याच्या स्त्रोताचे २६२२ पाणी नमुने तपासणीसाठी जिल्हा प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असता जिल्हा प्रयोगशाळेतून प्राप्त झालेल्या अहवालानुसार १६२ नमुने दुषित असल्याचे स्पष्ट झाले असून यामध्ये पिसई प्राथमिक केंद्रांतर्गत ४२ उंबर्ले, ३० आसूद, २६ दाभोळ, १७ फणसू, आणि १६ केळशी या गावांचे पाणी नमूने दुषित असल्याचे दिनांक २७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रामुख्याने पिसई प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत सर्वाधिक पाणी दुषित होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुषित पाणी असलेल्या गावातील स्त्रोतांचे शुध्दीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तालुका आरोग्य अधिकारी विभागाकडून माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ या कालावधीत सार्वजनिक वापर होत असलेल्या पाण्याच्या स्त्रोतांचे २८४० पाणी नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असता,१५२ पाणी नमूने दुषित असल्याचे आढळून आले. यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र पिसई ४१, उंबर्ले २९, आसुद २७, दाभोळ ९, फणसु १७, केळशी १७, आंजर्ला ९, साखळोली ३ या गावांतील नमूने दूषित आहेत.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्र, पिसई अंतर्गत असणाऱ्या स्त्रोतांच्या परिसरातील तसेच इतर जलाशयाचे पाणी जात असल्यामुळे तेथील पाणी दुषित होते.
(३) संबंधित ग्रामपंचायतींना नियमित शुध्दीकरण योग्य पध्दतीने करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ व अकोला जिल्हा परिषदेच्या शाळांना वर्ग जोडण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्याबाबत**

**(८२) * ३३१३२ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ व अकोला जिल्हा परिषदेच्या शाळांना ५ वी ते ८ वी चे वर्ग जोडण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला जिल्हा परिषदेच्या शाळांना इयत्ता ५ वी ते ८ वी चे वर्ग सुरु करण्याचा निर्णय रद्द करावा या मागणीसाठी शैक्षणिक समन्वय समितीने माहे मे, २०१७ च्या पहिल्या आठवडयात आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार १ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षण उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांवर आहे. त्यानुषंगाने अकोला व यवतमाळ जिल्हा परिषदांनी प्राथमिक शिक्षणाचे Elementary Cycle पूर्ण होण्याच्यादृष्टीने त्यांचे अंतर्गत जिल्हा परिषद शाळांना ५ वी चा व ८ वी चा वर्ग जोडण्याची कार्यवाही केली आहे.

-----------------

**शालेय शुल्क नियंत्रण कायद्यात सुधारणा करण्याबाबत**

**(८३) * ३१२१६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.विनायकराव मेटे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विद्यमान शालेय शुल्क नियंत्रण कायद्यात सुधारणा करण्याबाबत जाहिर केले असल्याने शुल्क अधिनियम पुनर्रिक्षण समिती गठीत केली असून गठीत केलेल्या समितीमध्ये निवडलेल्या ६ पालकांना काढुन तेथे अन्य पालकांना नेमल्याचे दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीतील सदस्यांनी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन अधिनियम, २०११ मध्ये पालकांकडून सूचना, हरकती आणि तक्रारी मागविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असल्यास विद्यमान शालेय शुल्क नियंत्रण कायद्यात कोणत्या सुधारणा करण्यात आल्या आहेत तसेच शालेय शुल्क नियंत्रण कायदयातील सुधारणांमुळे नफेखोर शिक्षण संस्थांवर शासनाचे नियंत्रण असेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समितीने सादर केलल्या अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ मध्ये सुधारणा करणेसंदर्भात नियुक्त केलेल्या समितीने पालक, जनता यांचेकडून सूचना/हरकती मागविल्या होत्या.

(३) सदर समितीचा अहवाल अदयाप शासनास सादर झालेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मेळघाट (जि.अमरावती) येथील विद्यार्थी गणवेशापासून वंचित असल्याबाबत**

**(८४) * ३३२१२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नव्या धोरणानुसार शालेय विद्यार्थ्यांना गणवेशासाठी मिळणारे पैसे आई व मुलाच्या संयुक्त खात्यात जमा करणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाट (जि.अमरावती) येथील कुटुंबांनी आर्थिक परिस्थितीअभावी तसेच बँकाकडून व्यवस्थित सुविधा पुरविल्या जात नसल्याने बँकेत खाती उघडली नसल्याने सुमारे २४ हजार विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना गणवेश मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश वाटप योजनेचा लाभ रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (Direct Benefit Transfer) जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(८५) * ३२१८३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास विविध संवर्गातील १०६ पदे भरण्यासाठी शासनाने दिनांक १७ जून, २०११ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली असून अद्याप रिक्त पदे भरण्याची कार्यवाही न झाल्याने कर्मचारी संख्या कमी होवून त्याचा कामकाजावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पदे भरण्यास मान्यता दिली असूनही निधी मंजूर न केल्याने पदे भरण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही. वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम २४ येथील तरतूदी नुसार वक्फ मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्याचे अधिकार राज्य वक्फ मंडळाला असून त्याबाबतचा तपशील वक्फ मंडळाने राज्य शासनाशी सल्ला मसलत करुन ठरविण्याची तरतूद आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने त्यांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची संख्या ५१ वरुन १०६ इतकी करण्याच्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या प्रस्तावास राज्य शासनाची सहमती प्रदान करण्यात आलेली आहे. वक्फ मंडळाच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याविषयीची सेवाप्रवेश नियमावली तयार करण्याची कायदेशीर प्रक्रिया वक्फ मंडळामार्फत सुरु असून सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर या पदांवर नियुक्त्या करणे शक्य होणार आहे.
(२) नाही. वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ७७ (४) (क) मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन वक्फ फंडातून अदा करणे अपेक्षित असून मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद वगळता वक्फ मंडळातील इतर कोणत्याही पदाच्या वेतनासाठी राज्य शासनाकडून अनुदान दिले जात नाही. सबब, शासनाने निधी मंजूर न केल्याने वक्फ मंडळातील पदे भरण्यास अडचणी येत आहे हे विधान वस्तुस्थितीवर आधारित नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इफेड्रीन प्रकरणाच्या तपासणीत गैरप्रकार आढळून आल्याबाबत

**(८६) * ३१३५० श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७२३२ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इफेड्रीन प्रकरणी केलेल्या तपासणीत ३७ प्रकरणात गैरप्रकार आढळून आल्याने या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंबंधी मा. मुख्यमंत्र्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्यामार्फत या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी आढळून आलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) होय, सह आयुक्त (दक्षता) यांनी दिनांक १९/०९/२०१६ ते दिनांक २१/०९/२०१६ या कालावधीत केलेल्या आस्थापना विभागाच्या तपासणीमध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा बाबी संबंधी ३७ धारिका प्रलंबित असल्याचे आढळून आले होते. प्रशासनाकडून सदर धारिका निकाली काढण्यात आल्या आहेत. सदर विलंबाबाबत संबंधितांचा खुलासा घेण्यात आला असून याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदर ३७ प्रकरणे सोलापूर येथील इफेड्रीनशी संबंधीत नाहीत.

सोलापूर येथील इफेड्रीन प्रकरणात सह आयुक्त (विधी), अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०७/०४/२०१७ रोजी ४ सदस्यीय समिती स्थापन करण्यात येऊन समितीने त्याचा अहवाल शासनास दिनांक ०५/०६/२०१७ रोजी सादर केला आहे. सदर अहवालात तत्कालीन सहायक आयुक्त, सोलापूर व तत्कालीन औषध निरिक्षक या २ अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा १९७९ मधील नियम ८ अथवा १० अंतर्गत विभागीय चौकशी करण्याबाबत शासनास शिफारस करण्यात आली आहे. सदर प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.